
venkatesh
AGRO TOURISM KALAMBA
VENKATESH
AGRO TOURISM KALAMBA
That is Venkatesh Agro Tourism in a nutshell.
Perfect destination for you and yours to celebrate togetherness
176/A, Kalamba Road, Tal. Karveer, Dist. Kolhapur
9284890234, 8999210023


HR
HOTEL RADIANT
RESTAURANT | BAR | STAY | BANQUETS
Special packages for
Corporate Events
Birthday Parties
Engagements
Imperial AC Banquet of 200 capacity
Wave terrace banquet of 200 capacity
Terrace Resto-Bar
41 AC Rooms
IMPERIAL BANQUET BY HOTEL RADIANT
WAVE BANQUET BY HOTEL RADIANT
Imperial AC Banquet
Wave Terrace Banquet
Rooftop Dining
41 AC Rooms
96230 63853
90216 56676
Hotel Radiant, Near Central Bus Stand, Kolhapur
hoteltheradiant.com
hotelradiant


PATIL
ENGINEERING WORKS
1243/1, 'E' Ward, Near Shree Krishna Mandir,
Shivaji Udyamnagar, Kolhapur 416 008.
Mobile : 09422046349, 09823077343
E-mail : sanjay@malatigroup.com
Manufacturers of : Automatic Adjustable Supari Cutting Machine, Supari Cutting Machine
सुपारी फोडण्याचे मशिन Betelnut Cutting Machine
ऑटोमॅटीक ॲडजस्टेबल
Automatic Adjustable
घरगुती विजेवर चालते
Operates on Domestic Electricity
डायमंड कटींग सुपारी मशिन
Diamond Cutting Betelnut Machine
घरगुती विजेवर चालते
Operates on Domestic Electricity
हॅण्ड ऑपरेटेड मशिन
Hand Operated Machine
विदाऊट ॲडजस्टेबल
Without Adjustable
घरगुती विजेवर चालते
Operates on Domestic Electricity
सुपारी चाळण मशिन
Betelnut Siever Machine
घरगुती विजेवर चालते
Operates on Domestic Electricity
ताशी ४० किलोपासून ३०० किलोपर्यंत सुपारी फोडण्याची क्षमता
Monday Closed
वैशिष्ट्ये
• ऑटोमॅटिक ॲडजेस्टेबलमध्ये कोणतीही साईज.
• डायमंड कटिंग मशिन कोणत्याही साईजमध्ये.
• सर्व प्रकारच्या साईजमध्ये सुपारी फोडता येते.
• खालील सर्व पदार्थ कटिंग करता येतात.
• बदाम व पिस्ता • सुंठ
• हळकुंड • डिंक • चिंचोका
• कमी जागा • अल्प भांडवल
• सर्व मशिनरीची किंमत इलेक्ट्रीक मोटर सोडून.

''आज्जे, ए आज्जै... मला पाच रूपे दे... पलिकडच्या गल्लीत गोळावाला आलाय. मला खायाचाय गोळा...'' दारातूनच त्यानं आज्जीला फर्मान सोडलं.

''आरं माझ्या लेकरा आत ये... मग देतू तूला पैसं...'' त्यांचा त्यांचा संवाद सुरू.

महेश बसलेल्या खूर्चीवरूनच सारं ऐकत होता. मनातून नाराजी दाखवत पोरगा तिथंच उभा. पाण्याचा तांब्या महेशच्या हातात देत आजी म्हणाली, ''तुमी बसा जरा... हा माझा नातू सोमू. शाळत जातो. तिसरीच्या वर्गात हाय.''

''सोमू... जरा पावन्यांबरोबर बोलत बस. म्या शेजारच्या आक्काकडून तुला पैसं आणून देतो.''

सोमूचा चेहरा खुलला... तो 'बरं' म्हणून तिथंच बसला... आजी घराबाहेर पडली.

सोमू महेशकडे तुम्ही कोण? या नजरेने बघत होता.

''तुम्ही पण आजीकडं पैसे मागायला आलात काय?''

अचानक आलेल्या या प्रश्नाला काय उत्तर द्यावं महेशला समजलं नाही. तो काही बोलणार, इतक्यात सोमूच बोलायला लागला...

''मला माहित हाय. माज्यासाटी आजी दरवेळीस कुणा ना कुणाकडून पैसे घेते आणि मग माळवं विकून त्यांचे पैसे परत देते... तुमचं किती रुपये हायत?''

याही प्रश्नाचं उत्तर महेश विचार करून देणार तोवरच सोमू पुढे सुरू झाला. ''आमी दोगच राहतो इथं. माज्ये आईबाबा न्हाईत असं आजी सांगते. कुटं गेले असं इचारलं तर देवाच्या गावाला एवढच सांगते. दुसऱ्याच्या मळ्यात राबून, माळवं विकून, धुणीभांडी करून माजी आजी जेवाय देते. आजी म्हनते, गरीब मानस देवाची लाडकी असतात. त्यांना काय वाईट होऊ नये म्हनून देव जास्तीचं पैसे, सुख देत न्हाई. नायतर मंग ती देवाला इसरत्यात.''

महेश त्याच्या बोलण्याच्या लकबीने गुंग झाला. मानेनच प्रतिसाद देत त्याच्या चेहऱ्याकडे तो बघत होता. जे आहे ते सगळं खरं खरं सांगायचं, बोलायचं इतकाच त्या निरागस मनाचा आचार. हेच खरं बोलणं. आजी येईपर्यंत पाहुण्यांशी आपणच बोलत बसायला हवं, आपलच काम आहे ते अशा आविर्भावात सारं चालू होतं.

आजी पलिकडच्या गल्लीत गेलीय म्हणजे नक्की कुठल्या हे त्यालाही माहिती नव्हतं. आता या माणसाचे आणि माझ्या गोळ्याचे पैसे आणायला वेळ तर लागणारच असा मनात विचार करून तिथंच दरवाज्यापाशी तो बसला. हेतू हा की, आजी आलेली दिसली की पैसे घेऊन पळायला बरे गारेगार गोळा घ्यायला. परत एकदा त्याने विचारले, ''तुमचं किती पैसं हायत?''

महेश म्हणाला, ''का रे, तू देणार का?'' तशी मान जोरात नकारार्थी हलवत म्हणाला, ''नाय... चार भोपळे आजून हायत घरात. तेच दे म्हनलं असतं आजीला. ते घ्या आन् जावा. परतच्याला आनी काय तरी दिलं आसतं. एकदम समजूतदार माणसासारखं कधीतरी वागाय पाहीजे. आजीचं वाक्य आता आटवलं. जे आहे ते.'' असं बोलून पुन्हा दाराकडं लक्ष देत तो म्हणाला, ''इतक्यात आजी येताना दिसलीती.''

पण आजीच्या चालीवरून त्याच्या लक्षात आलं की पैश्याची जोडणा झालेली दिसत नाही. तरीपण आजी भराभरा घरात आली. ''सोम्या, आरं शांताक्का नव्हती घरात. मग...''

तिचं वाक्य पुरं होत न होतं, तेवढ्यात सोमूने रडायला सुरुवात केली. हमसून हमसून रडायला लागला. ''काय सांगू नको, दहा दिस झालं काय सुदीक तू दिलं न्हाईस. ना खायाला काय नवं आणलं

न्हाईस, ना खेळाय काय आणलस. ना माला दप्तर आणलसं.'' डोळ्यातून गंगाजमूना अखंड वाहत होत्या. आलेल्या माणसासमोर काय नको म्हणून आजी सोमूला जवळ घेत म्हणाली. ''आणतो रं राज्या !''

आता महेशला अवघडल्यासारखं झालं. खरंतर तो आजीची विचारपूस करायला, चौकशी करायला एवढी गाडी हाकत आला होता मनाची घालमेल थांबावी म्हणून. पण इथं सहजपणे घडणाऱ्या घटनेतून मनाला आणखीच... तरीही तो बसून राहीला. कधी कधी आपण कळसूत्री बाहुली कशी आहोत हे नियती इतके सहज दाखवून देते... समोर घडणाऱ्या प्रसंगाकडे अलिप्तपणे पाहतोय. बास...

सोमूच्या रडण्याचा आवाज आता शब्दात बदलू लागला. ''आज्जे, तू कायम म्हणतीस ना, देवाकडं हात जोडून मागितलं तर देव देतो. मग गेले महिनाभर मी रोज देवाकडं एक दप्तर मागतोय तर आजून देवाला द्याया जमलं न्हाई काय? शाळा चालू होवून चार महिनं लोटलं... त्या रम्या, दाद्याकडं नवं चोख दप्तर हाय. तुला कवापासून सांगतोय तर म्हनलीस, भोपळं येईस्तवरं थांब. आता तर आठ दिस झालं भोपळं काढून. बाजारात जावून बी आलीस. तरी...'' शब्द थांबले आणि सूर सुरू झाला.

आता मात्र आजीचे पण डोळे भरून आलं. चार महिनं राबलो. निगुतीन निगा केली. जशी जमतील तशी माळवं करून बाजारात इकुन आलो. शेळ्या माकडांपासून वेल वाचाय हवा म्हनून साडी गुंडाळून भोपळ्याकडं डोळ्यात तेल घालून ध्यान ठेवलं. पन... परवाच्या बाजारात... केलेल्या कष्टाला बी मोल नाय. माज्या नातवाचं दप्तर किती रुपयाला म्हनून दुकानदाराला इचारुन भोपळ्याचं भाव लावलं, पन मायबाप भोपळं विकत घेनाऱ्यांनी अर्ध्या रूपयाचं बी मोल केलं न्हाई. कष्टापरी केल्यालं कष्ट बी कुनाला दिसलं न्हाई. राखणारा कसा राखतो, वाढवतो याचं बी मोलं न्हाई. माझ्या मनाला बरं वाटना. ऊर भरून ईत व्हता, म्हनून चार भोपळं इकून आलेलं पैस घेऊन घरी आलो.

वाटत येताना दप्तरवाल्या दुकानदाराला इचारलं. 'कितीला रं देनार शाळेचं दप्तर?' त्यानं सांगितलेलं आकड्याएवढं बी पैसं आलं नव्हतं पदरात. सोमूचा चेहरा सारका डोळ्यासमोर येत व्हता. पण डोळ्यातल्या पाण्यानं पुढचं दिसाय बंद झालं. झाला बाजार बास झाला म्हनून घरी आलो. तवापासून मनच व्हईना बाजारात जायाला. पोर माजं आस लावून बसलय.

देवापुडं हात जोडून मागितलं की देव आपल्याला देतो. मीच सांगितलय त्याला. पन ते हात दुसऱ्या कुनाचे असतात, आन ती वेळ बी दुसरा कोन मनात आनील तवा येते. हे त्याला कसं समजावू? हातावर देवून...कोपरावर मारनारी माणसं जोवर हायीत तोवर कष्टकऱ्यांच्या आनी गरिबांच्या पोटाला आनी पाठीला देवाचा आशीर्वाद मिळायचा नाय हेच खरं...''

डोळ्यांना पदर लावत आज्जी सोमूच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाली, ''कवा तरी तूच मोठा होवून दुसऱ्याच्या हातात देणारा हो... मग माझं कष्ट फिटलं बग !''

महेश हे सारं तिथंच बसून, साक्षीदार बनून पहात होता. आपण आलो याचं कुठेतरी त्याला समाधान होतं. सोमूच्या हातावर गोळ्यासाठी पैसे ठेवून तो आजीला म्हणाला, ''आजी, येतो मी. उद्या आमच्या गावच्या बाजारात चारी भोपळे घेऊन ये. देवानं हातावर देऊन तोंडात घास घालायला पण माणसाला शिकवलय. सोमूच्या पाठीवर दप्तराचा आशीर्वाद तो देवच देईल !''

# शारदा ते पूजा

**ज्योत्स्ना शिंत्रे**
मोबा. ९९२००५८७०५






आज आपला विषय आहे, शारदा ते पूजा

या विषयाचा अर्थ काय? तर अर्थ असा आहे की देवलाची नायिका शारदा ते आजच्या जगातील पूजा खेडकर ! या कालखंडामध्ये स्त्रियांचं समाजात असलेलं स्थान कसं कसं बदलत गेलं हे मी काही स्त्रियांची प्रातिनिधीक उदाहरणे घेऊन सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

या विषयाची सुरुवात आपण शारदा नाटकाच्या समकालीन दोन अत्यंत प्रसिद्ध स्त्रियांपासून करूया. या दोघी आहेत, डॉ. आनंदीबाई गोपाळ जोशी, आणि लक्ष्मीबाई टिळक.

डॉ. आनंदीबाई जोशी या भारतातील पहिल्या महिला डॉक्टर म्हणून ख्यातकीर्त झाल्या. पण त्यांच्या शिक्षणाची आणि जडणघडणीची सुरुवात ही धाक दपटशा आणि जबरदस्तीतून झाली होती. दहा वर्षाच्या कोवळ्या मुलीचे लग्न बत्तीस वर्षाच्या एका बीजवर पुरुषाबरोबर करून दिले गेले. त्या पुरुषाच्या म्हणजे गोपाळरावांच्या शिक्षणाच्या ध्यासामुळे त्या शिकू लागल्या., पण स्वखुशीने नव्हे तर धाकाने, जबरदस्तीने... एकीकडे मी तुला सोडून जाईन तू शिकली नाहीस तर अशी नवऱ्याची दरडावणी आणि त्यासाठी दिवसाउजेडी नवऱ्याच्या खोलीत जाण्यामुळे माडी उतरल्यावर पडणारा जळक्या लाकडाचा मार. अशा विचित्र परिस्थितीत लहानगी आनंदी पिचून निघत होती. शेवटी या सगळ्या कटकटींना वैतागून गोपाळरावांनी आपली बदली अलिबागला करून घेतली आणि आनंदीच्या रीतसर शिक्षणाची सुरुवात झाली. पण तिथेसुद्धा जरा मनाविरुद्ध झाल्यास मिळणारा नवऱ्याचा मार एकीकडे आणि दुसरीकडे गावात शेजार-पाजाऱ्यांचे टोमणे, कुजकी नासकी बोलणी, अघोषित बहिष्कार याला जोशी कुटुंबाला सामोरे जावे लागले, कारण काय तर नवरा बायकोला शिकवतो, संध्याकाळी फिरायला नेतो. पायात जोडे घालू देतो. अशा सगळ्या समाज नियमांच्या विरुद्ध गोष्टी जोशांच्या घरात चालू असत.

पुढे शिक्षणामुळे प्रगल्भता आलेली आनंदी डॉक्टर होण्याच्या ध्येयाने अमेरिकेला जायला निघते. पण इंग्रज बायकांची तिच्याशी होणारी तुच्छ वागणूक एकीकडे आणि दुसरीकडे ती आता आपल्यापेक्षा खूप पुढे जात आहे या विचाराने गोपाळरावांची

होणारी घालमेल, दुखावला जाणारा पुरुषी अहंकार, तिच्या अमेरिकेतील आयुष्यावर त्यानी घातलेली विचित्र बंधने, नियम आणि शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या हेळसांड झाल्यामुळे क्षयग्रस्त आनंदीला भारतात परत आल्या आल्या मृत्यू गाठतो, आणि इतक्या कष्टाने घेतलेल्या वैद्यकीय शिक्षणाचा काहीच उपयोग न होता आनंदीला लहान वयातच जीवन यात्रा संपवावी लागते.

जर तिच्यावर समाजाची आणि तिच्या नवऱ्याची अशी विचित्र बंधने नसती, जर ती सुखाने अमेरिकेला जाऊन आली असती, तर तिची शारीरिक आणि मानसिक घुसमट झाली नसती आणि भारताला एक स्त्री-रत्न इतक्या लहान वयामध्ये गमवावे लागले नसते.

लक्ष्मीबाई टिळकांनी लिहिलेल्या 'स्मृतिचित्रे' या आत्मचरित्रामुळे त्या बहुतेक सगळ्यांना परिचितच आहेत. त्यांचे पती नारायण वामन टिळक हे रेव्हरंड टिळक या नावानेही परिचित आहेत. एका कट्टर ब्राह्मण कुटुंबात लग्न होऊन गेलेल्या सहा वर्षाच्या मनकर्णिकेला लग्नानंतर लक्ष्मीबाई असे नाव मिळाले. कडक सोवळे पाळणाऱ्या अतिशय कर्मठ आणि विक्षिप्त स्वभावाच्या सासऱ्यांच्या हाताखाली त्यांचे लग्नानंतरचे आयुष्य मोठ्या कष्टात त्रासात गेले. शिवाय नारायणराव हे नोकरीबाबत धरसोड वृत्तीचे असल्याने त्याच्या आयुष्याला कधी स्थिरता येऊ शकली नाही. त्याचीही लक्ष्मीबाईनी कधी तक्रार केली नाही.

स्वतः नारायण टिळक हे देखील स्वभावाने थोडेसे विक्षिप्तच होते. सतत नोकऱ्या धरायच्या सोडायच्या, नोकरी बदलून दुसऱ्या ठिकाणी बिऱ्हाड हलवले की पहिल्या घरातले सगळे सामान तिथेच सोडून जायचे आणि नवीन सामान घेऊ या असे सांगायचे. पण प्रत्येक नोकरी काही त्याच तोलामोलाची नसायची. हळूहळू घरातले सगळे संसारउपयोगी सामान कमी होत गेले. सव्वा रुपयात आणि सव्वा शेर ज्वारीमध्ये बावीस मुलांना सांभाळायची जबाबदारी लक्ष्मीबाईवर आली. तरी त्यांनी तक्रार केली नाही. तो त्यांचा स्वभावही नव्हता आणि त्या काळातल्या समाज परिस्थिती-नुसार ते शक्यही नव्हते. त्यामुळे लक्ष्मीबाई कसातरी संसार रेटत होत्या. त्यातच ख्रिस्ती विचारांनी प्रभावित होऊन टिळकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्या वेळेस त्यांच्या आयुष्यातील खरा वाईट काळ सुरु झाला असे म्हणावयास हवे. आपल्या आत्मचरित्रात लक्ष्मीबाईंनी फार काही लिहिले नसले तरी आपण त्याची कल्पना करू शकतो. समाजाची किती मोठी प्रतिक्रिया झाली असेल आणि त्याचा लक्ष्मीबाईंना किती त्रास झाला असेल याचे एकच उदाहरण आपल्याला 'स्मृतीचित्रा'तील एक प्रसंगातून कळते. त्यांनी शेवटचा उपाय म्हणून एका ख्रिस्ती फादरच्या घरी जाऊन आता मला पण बाप्तिस्मा द्या अशी विनंती केली होती. या एकाच प्रसंगांमधून त्यांची समाजाचा त्रास सहन करण्यातली कुतरओढ लक्षात येते.

टिळक धर्मांतर करणार हे लक्ष्मीबाईना कळले तेव्हा त्यांनी चार ओळीची कविता लिहिली-

**'म्हणे जातो सोडून नाथ माझा**
**अता कवणाला बाहू देवराजा..'**

ज्या शब्दावरूनच त्यांची अगतिक अवस्था आपल्या सहज लक्षात येऊ शकते.

त्यांचे कर्तुत्व आणि साहित्य यावरून एक गोष्ट आपल्या सहजच लक्षात येते की जर इतक्या विपरीत परिस्थितीत त्यांचे व्यक्तिमत्व इतके उभारून आले तर त्यांना योग्य सामाजिक परिस्थिती मिळाली असती तर त्या किती चमकल्या असत्या ! वयाच्या एका टप्प्यापर्यंत त्याना फक्त विपरीत परिस्थतीचा सामना करावा लागला, तो जर टाळला गेला असता तर त्यांचे कर्तृत्व किती उभारून असते? असा प्रश्न

साहजिकच आपल्या मनात उभा राहतो. त्यांचे खरे मोठेपण यात आहे की त्यांनी आपल्या आत्मचरित्रात आयुष्यातील सगळ्याच गोष्टी नर्म विनोदी शैलीत लिहिल्या आहेत. कुठेही त्यांचा राग, चीड, दिसत नाही, उलट आपल्याला मिळालेल्या गैर वर्तणुकीबद्दल त्यांनी समाजाला जणू माफ करून टाकले होते.

आता आपण वळू या सावित्रीबाई फुले यांच्याकडे. आधी आपण आनंदीबाई आणि लक्ष्मीबाई यांच्यासारख्या so called पुढारलेल्या सुशिक्षित ब्राम्हण समाजातील स्त्रियांची ससेहोलपट पाहिली. सावित्रीबाई तर माळी समाजाच्या होत्या.

सावित्रीबाई फुले यांचा जन्म १८३१ साली झाला होता. त्यावेळच्या रुढीप्रमाणे त्यांचाही बालविवाहच झाला होता. त्या स्वतः ९ वर्षाच्या आणि त्यांचे पती ज्योतिराव फुले १३ वर्षाचे. ज्योतिराव स्वतः शिकत होते. त्यामुळे त्यांना आपल्या पत्नीनेही शिकावे, सुशिक्षित असावे, असे वाटत होते.

परंतु त्या काळच्या प्रथेप्रमाणे एकत्र कुटुंबात पती पत्नींना दिवसाढवळ्या एकमेकांशी बोलायचीही चोरी होती. याचाच त्रास आनंदीबाई जोशींनाही झाला होता. कदाचित सावित्रीबाईनाही तो झाला असता, पण हुशार आणि समयसूचक स्वभावाच्या ज्योतिरावांनी यावर एक मार्ग शोधून काढला.

ज्योतिराव रोज मळ्यात काम करायला जात असत. तिथेच त्यांनी सावित्रीबाईंना जेवण आणण्याच्या निमिताने बोलवायला सुरुवात केली. मातीची पाटी, डहाळीची लेखणी आणि मोजणीसाठी झाडांची पानं फुले आशा साहित्यानिशी सावित्रीबाईचे शिक्षण सुरू झाले.

खरं तर आपल्याच घरातील आजी-पणजी इतरही वयस्कर स्त्रियांकडून आपण सर्वानीच कधी ना कधी उत्कृष्ट प्रकारच्या स्वरचित ओव्या, काव्ये उखाणे, भजने, ऐकली असतील. त्यांची बुद्धिमत्ता त्यांच्या व्यवहार चातुर्यातून, काटकसरीतून, नियोजनातून आपल्याला प्रत्ययाला आली असेलच, परंतु घराचा उंबरठा किंवा माजघर हीच त्यांची मर्यादा मानली गेल्यामुळे त्यांना औपचारिक शिक्षण कधी मिळालेच नाही. लिहिणे वाचणे येत नसतानाही मौखिक पाठांतर, औषधांची माहिती आणि संसारोपयोगी ज्ञान त्यांच्याकडे भरपूर होते.

अशा वेळेस त्यांच्या मदतीला सावित्रीबाईं-सारख्या स्त्रिया क्रांतीज्योतीसारख्या अवतरल्या. अर्थात त्यांना त्याची फळेही फार वाईट तऱ्हेने भोगावी लागली. आपली सून शिकत आहे आणि तिला मुलाचाच पाठिंबा आहे हे कळल्यानंतर घरच्या मोठ्या माणसांनी फुले दंपतीला घराबाहेर काढले.

अर्थातच समाजाचा तीव्र अधिक्षेप त्यांना स्वीकारावाच लागला. सतत समाजाविरुद्ध संघर्ष करावा लागला. पण त्यातून सहज सोपा मार्ग कसा काढावा याचे उत्कृष्ट ज्ञान फुले दाम्पत्याला होते. याचे एकच उदाहरण सांगते, केशवपन करून विधवेला विद्रुप करणे ही एक अत्यंत क्रूर, रानटी प्रथा तेव्हाच्या समाजात अस्तित्वात होती. समजावून सांगून सुद्धा समाज ऐकत नाही म्हटल्यावर केशवपन करणाऱ्या नाभिक समाजाला फुले दंपतीने हाताशी धरले. त्यांचे प्रबोधन केले आणि त्यांच्याकडूनच या विधीला नकार मिळवला.

कुठल्याही विपरीत सामाजिक परिस्थितीत न बोलता विरोध दर्शवणे हेच फुले दाम्पत्याचे धोरण होते. त्याचबरोबर मनाला पटणारा मार्ग न सोडणे हे देखील ! स्त्रियांची शाळा सुरू केल्यावर त्या शाळेत शिकवायला जाताना रस्त्यावर गावातले लोक सावित्रीबाईंवर चिखल, घाण, शेण फेकीत असत. परंतु चकार शब्द न काढता त्या शाळेत जात. फक्त बरोबरची जास्तीची स्वच्छ साडी शाळेत गेल्यावर बदलून टाकत आणि आपले ज्ञानदानाचे पवित्र काम

चालू ठेवत.

चांगल्या घरातल्या स्त्रियांबरोबरच त्यांनी वंचित, दलित समाजाच्या स्त्रियांसाठीही शाळा काढल्या. शिवाय विधवांना झालेली अनौरस मुले आणि शरीरविक्रय करणाऱ्या स्त्रियांची मुले यांच्यासाठी त्यांनी आश्रम काढला. विधवा विवाह, आरोग्य याही क्षेत्रात त्या कार्यरत होत्या. एवढेच नाही तर अशाच एका ब्राह्मण विधवेवर झालेल्या बलात्कारातून जन्मलेला मुलगा त्यांनी दत्तक घेतला. जेव्हा महात्मा फुले यांच्या निधनानंतर त्या मुलाला- यशवंताला त्यांनी अग्नी द्यायला सांगितला, तेव्हा वारसा हक्क मिळू नये म्हणून पुतण्याने त्याला विरोध केला. तेव्हाही एकही शब्द न उच्चारता, न भांडता, न वादविवाद करता सावित्रीबाईंनी स्वतः पुढे येऊन ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला आणि नातेवाईकांचा विरोध मिटवून टाकला. पुढे यशवंताच्या लग्नाच्या वेळी देखील एका भिन्न जातीच्या कार्यकर्त्याच्या मुलीबरोबर त्याचे लग्न लावून दिले आणि आंतरजातीय विवाहाचा पायंडा सुरू केला.

१८९७ च्या महाभयंकर प्लेगच्या साथीत रुग्णांची सेवा करताना झालेल्या संसर्गामुळे सावित्रीबाईंचे निधन झाले. संपूर्ण आयुष्यभर समाजाबरोबर मूक संघर्ष करून जिंकून दाखवणाऱ्या सावित्रीबाईंची ही कथा आपल्याला नक्कीच प्रेरित करेल आणि शांत राहूनही आपले कार्य कसे साधता येऊ शकते हा वस्तुपाठ घालून देईल.

आत्ताच आपण सावित्रीबाई फुले यांच्या-सारख्या एका क्रांतीज्योती बद्दल जाणून घेतले. त्या खरोखरच ज्ञानाची एक ज्योत बनूनच समाजात कार्य करत होत्या. ज्योतीला जसे वादळ- वाऱ्यात टिकून रहाण्याचे आव्हान असते, तशीच अनेक प्रकारची आव्हाने सावित्रीबाईंनी झेलली आणि पचवलीसुद्धा.

आता आपण पुढे वळूया अशा दोन स्त्रियांकडे ज्या एकाच कुटुंबातल्या आणि नात्याने बांधलेल्या होत्या. दोघी एकाच क्षेत्रात काम करीत होत्या. पण त्यांच्या भिन्न सामाजिक पार्श्वभूमीमुळे आणि भिन्न स्वभावामुळे एकीचे आयुष्य सुकर गेले आणि दुसरीचे दुष्कर.

मालतीबाई कर्वे या सुप्रसिद्ध समाजसुधारक आणि समाजसेवक महर्षी कर्वे यांची पुत्र वधू आणि समाजप्रबोधक र. धों. कर्वे यांची सुविद्य पत्नी. पतीला अध्यापकाची नोकरी होती. तेव्हा आयुष्य सुखात आणि सुबत्तेत जायला काहीच हरकत नव्हती. पण दैवयोग काही वेगळाच होता. रघुनाथ कर्वे हे संततीनियमन या विषयाने प्रभावित झाले आणि त्यांनी संततीनियमन साधनांचा पुरस्कार करायला सुरुवात केली आणि स्वतःला एकही मूल नसतानासुद्धा स्वतःवर संतती नियमनासाठी शस्त्रक्रिया करवून घेतली. अर्थात मालतीबाईंच्या पूर्ण संमतीनेच. पण असे असूनसुद्धा वांझ असे विशेषण मालतीबाईंच्या मागे लागले. त्याकाळच्या समाज रितीनुसार जोडप्याला मूल झाले नाही म्हणजे दोष बाईचाच, तिच मूल जन्माला घालायला अक्षम असे समजले जात असे. कोणत्याही शुभ कार्याच्या वेळी तिला टाळले जात असे. अशीच संभावना मालतीबाईंचीही होत असे. शिवाय नंतर तर त्यांनी आपल्या पतीच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यायला सुरुवात केली. पतीची नोकरी या कार्यापोटी गेली. त्यांच्यावर खटले झाले. परंतु मालतीबाईंनी रघुनाथरावांची साथ सोडली नाही. त्यांनी आपल्या पतीला तन-मन-धन अशा सर्वार्थाने आयुष्यभर साथ दिली. पण त्या दोघांनाही आयुष्यभर एक प्रकारच्या सामाजिक बहिष्काराला तोंड द्यावे लागले.

या क्षेत्रात काम करणाऱ्या आणि रघुनाथरावांची बहीण असणाऱ्या एका स्त्रीच्या आयुष्याबद्दल आता आपण जाणून घेऊ या. मालतीबाई आणि शकुंतलाबाई या दोघीही एकाच

क्षेत्रात काम करणाऱ्या आणि एकाच माणसाच्या विचारसरणीने प्रभावित झालेल्या होत्या. पण भिन्न सामाजिक पार्श्वभूमीमुळे दोघींचे आयुष्य वेगवेगळे झाले.

शकुंतला परांजपे या सुप्रसिद्ध विचारवंत आणि विद्वान असे रँग्लर परांजपे याच्या कन्या. महर्षी कर्वे आणि रँग्लर परांजपे आते-मामे भाऊ होते. म्हणून शंकुतलाबाई या रघुनाथरावांच्या चुलत बहीण लागत होत्या. त्यांना त्यांच्या वडिलांमुळे सामाजिक प्रतिष्ठा मिळालेली होती. रघुनाथरावांच्या संतती नियमनाचे कार्य, तळमळ आणि या कार्याची जरुरी त्यांना इतकी भावली, जाणवली की त्यांनी या कार्यात स्वत:ला झोकून दिले. त्या स्वत: संतती नियमनाचे क्लिनिक चालवीत. पुण्यात आणि गावोगावी जाऊन मेळावे घेऊन लोकांना या विषयाची आवश्यकता पटवून देत आणि ती देखील प्रात्यक्षिकांद्वारे. ज्या काळात या विषयाचे नाव उच्चारणे महापाप समजले जायचे, त्या काळात त्यांनी स्वतःची ग्रामीण स्त्री-पुरुषांची टीम तयार केली. ग्रामीण भागातल्या लोकाना त्यांच्या भाषेत शिक्षण मिळावं, विश्वास वाटावा म्हणून.

परंतु शंकुतलाबाईच्या कौटुंबिक पार्श्वभूमीचा आणि त्यांच्या स्वतःच्या शिक्षणाचा, स्वाभाविक फटकळपणाचा इतका दबदबा पुण्यात पसरलेला होता की, त्यांना समाजाकडून फारसा काही त्रास झाला नाही. लोक त्यांच्याबद्दल मागून बोलत, टीका करत, पण त्यांना उघड उघड टीका, बहिष्कार असल्या गोष्टीना सामोरे जावे लागले नाही.

याचे एकच कारण ते म्हणजे त्यांचा अंगभूत धीटपणा. याच धीटपणाच्या अभावी त्याच्या आधी अनेक सद्गुणी स्त्रिया समाजाच्या दबावाखाली चिरडल्या गेल्या. त्यांना मारून मुटकून मन मारून आयुष्य कठावे लागले. परंतु शकुंतलाबाईंसारख्या स्त्रियांनी इतर महिलांना स्वतंत्र आयुष्याची वाट दाखवली असे म्हणावे लागेल. पुढच्या स्त्रियांना याच मार्गावरून मार्गक्रमण करतानाही सामाजिक दबावाखाली काही प्रमाणात तरी बळी पडावेच लागले आहे.

अगदी स्त्रिया शिकू लागल्या आणि नोकरी करायला लागल्या, तरीही घरातल्या पुरुषाच्या हातात आर्थिक नाड्या होत्या. शिवाय मुलींनी किती शिकायचे, काय शिकायचे, केव्हा तिचे लग्न करायचे, कोणाबरोबर करायचे याचे निर्णय घरातल्या पुरुषांच्या हातातच राहिले. परंतु घरातही त्यांना इतर मोठ्या बायकांच्या हाताखाली राहावे लागे. त्यांचे निर्णय मान्य करावेच लागत. आणि हे दबाव काही ठिकाणी इतक्या मोठ्या प्रमाणात असत की बऱ्याच ठिकाणी स्त्रीच स्त्रीची शत्रू आहे की काय? असा प्रश्न मनात उभा राहावा.

परंतु हळूहळू हे चित्र बदलत गेले. आर्थिक परिस्थितीच्या रेट्यामुळे स्त्री नोकरी करू लागली. आणि मग तिची महत्वाकांक्षा जागी होऊ लागली. तिच्यापेक्षा वरच्या जागेवर काम करणारे पुरुष जी दादागिरी, बॉसिंग करत वेळप्रसंगी गैरफायदाही घेत, ते सगळे तिला असह्य वाटू लागले आणि तिलाही आपण उच्चशिक्षण घ्यावे, नोकरीच्या ठिकाणी वरच्या जागा पटकाव्यात, अशी आकांक्षा निर्माण झाली. सुशिक्षित वडील आणि नोकरी करणारी थोडाफार का होईना पण शिकलेली आई यांचा पूर्ण पाठींबा मिळत गेल्यामुळे स्त्रीच्या पुढच्या महत्वाकांक्षेला खतपाणी मिळत गेलं आणि नोकरी लागल्यावर लग्न करून संसाराला लागणे आणि शक्य होईल तेव्हा नोकरीच्या जागी परीक्षा देऊन वरची जागा मिळवणे, यापेक्षा त्यांना माहेरी असतानाच उच्चशिक्षण घेऊन नोकरीत अधिकाराची जागा मिळवणे शक्य होऊ लागले. त्यामुळे लग्नाचे वयही बरेच पुढे पुढे गेले.

हे सर्व स्त्रियांच्या दृष्टीने चांगलेच झाले असे

वाटले, तरी याला एक दुसरी बाजूही आहे. जी हळूहळू समाजाच्या लक्षात येऊ लागली आहे. ती म्हणजे या सगळ्या प्रक्रियेमध्ये मुलींना, स्त्रियांना मिळणारे अमर्याद स्वातंत्र्य. सुरुवातीला मुलगी शिकते आहे, तेव्हा तिच्यावर अवाजवी बंधने नकोत असा विचार आई-वडील करतात. पण एक स्टेज अशी येते की मुली कसल्याच प्रकारच्या बंधनात रहायला तयार नसतात आयुष्याचा अनुभव कमी असल्याने योग्य निर्णय घेतील याची खात्री नसते परंतु अपरिपक्व वय आणि बुद्धी यांमुळे गैर प्रलोभनामागे वहावत जातात. स्वतःच्या चुकीच्या विचारांच्या आणि प्रतिमेच्या आकर्षणात सापडून चुकीचे निर्णय घेण्यास प्राधान्य देतात.

एकेकाळच्या पूर्ण नियंत्रणाखालील गुलामीतून मुक्त झालेली आजची स्त्री अनियंत्रित स्वातंत्र्याच्या चुकीच्या कल्पनांची गुलाम होत आहे असे मला वाटते. त्यातच बरोबरीच्या मित्र-मैत्रिणींच्या पिअर प्रेशरलाही आजची पिढी बळी पडत आहे. करिअर करणारे आई-वडील, घरात असलेल्या वरच्या पिढीचा अभाव (न्यूक्लिअर फॅमिलीमुळे) ओ.टी.टी. वर सतत होत असलेला पाश्चिमात्य संस्कृतीचा मारा आणि अनिर्बंध स्वातंत्र्य याचा परिपाक म्हणून अशी त्रिशंकू अवस्था तयार होत आहे. शिवाय आई-वडिलांना स्वतःच्या करीअरमुळे वेळच नाही आणि त्यामुळे पालक-पाल्य संवाद हरवत चालला आहे. ही गोष्ट तर सर्व समाजशास्त्रज्ञ ठणकावून सांगत आहेत.

या सगळ्या सामाजिक परिस्थितीचा परिपाक म्हणून मूळचे भारतीय संस्कार हरवत चाललेले आहेत, जे आयुष्यात संयम शिकवतात. एकीकडे मुलांवर संस्कार करण्यात आई वडील वेळेअभावी कमी पडत आहेत आणि एकीकडे मुले कशी मॉडर्न आहेत म्हणून शेखी मारताहेत.

याच सगळ्या सामाजिक परिवर्तनाचा परिपाक म्हणून आज श्रद्धा वालकर आणि निक्की यादव यांच्यासारख्यांच्या कहाण्या आपल्यासमोर येत आहेत. आई-वडिलांचं सांगणं न ऐकता अशा प्रकारच्या रिलेशनमध्ये रहाणाऱ्या या मुली वेळ पडल्यावर आपल्या आई-वडिलांचं, मित्रांचं, भावांचं संरक्षण मागतात खऱ्या, पण थोड्याश्या क्षमायाचनेनंतर, समजावणीनंतर त्याच जोडीदाराकडे बिनदिक्कत परत जातात. आणि स्वतःचा घृणास्पद, अघोरी मृत्यू ओढवून घेतात. हे आपल्या मनाला कुठेतरी विपरीत वाटत नाही का? मी माझं बघीन, सावरीन, इतरांनी त्यात लक्ष घालू नये हा अहंकारच अशा प्रकारच्या घटनांचा पाया आहे, असे तुम्हालासुद्धा वाटत नाही का?

एकीकडे एका काळच्या प्रतिष्ठित कुटुंबात गुपचूप घडणाऱ्या ऑनर किलिंगच्या प्रकारांना लाच्छनास्पद, गैर समजणारा आजचा आधुनिक समाज या अशा प्रकारच्या वर उल्लेख केलेल्या ऑनर किलिंगला काय प्रतिक्रिया देतो, तर हतबलतेची ! वर्षानुवर्षे कोर्टाच्या वाऱ्या केल्यावर एकदा कधीतरी न्याय मिळतो, तोही खरोखर मिळतो का नाही असाच प्रश्न पडतो. कारण म्हणतात ना Justice delayed is Justice denied पण हे सगळे प्रकार बघून, वाचून मला तर हरी नारायण आपट्यांच्या प्रसिद्ध कादंबरीचे उद्गार काढावेसे वाटतात, पण लक्षात कोण घेतो?

एके काळी स्त्रियांवर होणारे अन्याय आपण आधी पाहिले. आणि नंतर अतिस्वातंत्र्यामुळे स्त्रियांची झालेली स्थितीही बघितली. पण याचाच पुढचा भाग - भविष्य हे अति भीषण आहे हे मला आवर्जून नमूद करावेसे वाटते.

आज सर्वांच्या हातात आलेली इंटरनेट, सोशल मीडियासारखी साधने यांचा किती दुरुपयोग होतो आहे हे आपण रोजच्या वर्तमानपत्रातल्या बातम्यात वाचतो आहोत. तऱ्हेतऱ्हेने केलेली

ISO 9001 - 2015 CERTIFIED

SG PHYTO PHARMA PVT. LTD.
SG
Since 1980

GMP CERTIFIED

# एस.जी.फायटो फार्मा प्रा. लि.

पालसीन्यूरॉन कॅप्सूल चे निर्माते

चंद्रप्रभा वटी
आरोग्यवर्धिनी रस वटी
गोक्षुरादि गुग्गुळ वटी
गंधक रसायन वटी
हिंग्वाष्टक चूर्ण
महायोगराज गुग्गुळ वटी
सूतशेखर रस वटी (साधा)
सिंहनाद गुग्गुळ वटी
सितोपलादी चूर्ण
संजीवनी रस वटी
त्रिभुवनकीर्ती रस वटी
त्रिफळा गुग्गुळ वटी
योगराज गुग्गुळ वटी

शुभ दिपावली

४०, १००, ५००, १००० च्या पॅक मध्ये व चूर्ण ६० ग्राम मध्ये उपलब्ध

गुणवत्तापूर्ण आयुर्वेदिक औषधांचे निर्माते... सन 1980 पासून कार्यरत

532/1 निलगिरी अपार्टमेंट, प्लॉट क्र. 3, रिंग रोड, कोल्हापूर - 416004
फोन: 7875444011 / 0231-2691520
info@sgphyto.com www.sgphyto.com @sgphyto

barva®
SKIN THERAPIE

# WHAT IS BARVA

## Pure.Divine.

The origin of this word, Barva is Sanskrit.Our products are just that-a divine experience, manifesting from the pure material in nature.Like the fragrance of an incense stick lingers on,leaving the surroundings with a sense of divinity and mystifying beauty, in that same enchangting way do our products leave your skin looking radiant,with a lingering aura that brings out your natural beauty!Experience divine beauty from this pure goodness of nature.



**Experience Barva Skin Therapie.**

Shop our products online
www.barvaskintherapie.com

फसवणूक तर आहेच – जशी आर्थिक फसवणूक. परंतु सर्वात मोठा धोका आहे तो स्त्री शोषणाचा. स्त्रीचे वेगवेगळे अश्लील खाजगी विडिओ कधी खरे, तर कधी मॉर्फ केलेले तयार करून सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन स्त्रीचे शारीरिक मानसिक, आणि आर्थिक शोषण तर केले जातेच, पण याच धमकीपोटी इतर मुलींनाही याच जाळ्यात अडकवले जाते. हे गुन्हे समाजासमोर येण्यासाठी काही महिन्यांचा, काही वर्षांचाही काळ जाऊ शकतो आणि तेवढ्या काळात शेकडो हजारो मुली या जाळ्यात अडकतात. त्यातील काही नैराश्यापोटी आत्महत्याही करतात. पण मृत्यूसमयीही खरे कारण लिहू धजत नाहीत.

जेत्यांनी जितांवर विशेषतः जीत स्त्रियांवर अत्याचार, बलात्कार करायचे ही तर पूर्वापार चालत आलेली रीत. तेव्हा लोक म्हणत असत की, स्त्रीचे शरीर हाच तिचा मोठा शत्रू आहे. पण आजच्या तांत्रिक युगामध्ये किती वेगळ्याप्रकारे हे वाक्य खरे ठरत आहे !

धनुष्यबाणाचा शोध लागल्यावर समोरासमोर युद्ध करून स्वतःला जखम करून घेण्याची गरज उरली नाही. आजचे तांत्रिक ज्ञान हे समाजकंटक पुरुषांच्या हातात आलेली तीरकमानच आहे असे म्हणायला हवे. या तीरकमानीपासून आजच्या स्त्रिया, मुलीना वाचवण्यासाठी पालकांशी लहानपणापासूनच्या उत्तम विश्वासार्ह संवादाची गरज आहेच, परंतु शाळकरी वयापासून जरा मोठ्या विद्यार्थ्यांना या धोक्याची जाणीव करून देण्याची गरज आहे.

आपण याउलट उदाहरण म्हणून आता वर्तमानपत्रात गाजत असलेली पूजा खेडकर या मुलीची कथा पाहू या. तिचे वडील दिलीप खेडकर हे स्वत CLASS I ऑफिसर आहेत, शिवाय त्यांनी लोकसभा निवडणूक लढविली आहे. तरी त्यानी मुलीला I.A.S. ला प्रवेश मिळावा म्हणून Non Cremy Lyer चे प्रमाणपत्र मिळवून दिले. त्यात आणखी भर म्हणून मुलीला दृष्टिदोष असल्याचे आणि मानसिक इलनेस असल्याचे प्रमाणपत्र मिळवून दिले. शिवाय Non Cremylyer सिद्ध करण्यासाठी आई–वडिलांच्या खोट्या घटस्फोटाचे प्रमाणपत्रही सादर केले. त्यामुळे तिला OBC कोटा, दिव्यांग कोटा Non Cremylyer कोटा या तिन्ही गोष्टीचा फायदा घेता आला. त्यासाठी डॉक्टरना पैसे देऊन वश करण्यात आले.

हे सगळे प्रकरण तेव्हा उघडकीला आले जेव्हा प्रशिक्षण काळातच पूजा खेडकर यांनी लाल दिव्याची गाडी, स्वतंत्र केबिन यांची मागणी केली त्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास वेठीस धरले आणि विलक्षण त्रास देऊन दबाव टाकला.

जिल्हाधिकाऱ्याने या दबावाला बळी न पडता त्यांची तक्रार वर केली तेव्हा सर्व सत्य चौकशीत बाहेर पडले. आता त्यांचा प्रशिक्षणाचा काल रद्द करण्यात आला आहे व त्यांच्यावर कारवाई चालू आहे.

यावरून आपल्याला कळते की मुलीची अनैतिकतेची पायरी आता कुठवर गेली आहे आणि विशेष म्हणजे अशा मुलींना आई–वडिलांची देखील पूर्ण साथ – पाठिंबा आहे.


अशी ही समाजाच्या काही विभागांची नीतिभ्रष्ट अवस्था पसरण्यास, भरकटण्यास वेळ लागणार नाही. आणि समाजातल्या सुजाण माणसांना अशा किडलेल्या समाजाला पाहून असे म्हणण्याची वेळ येईल की –

**'अब पछताए होत क्या**
**जब चिड़ियां चुग गयी खेत?'**

तेव्हा हाच मंत्र अंगीकारुया. 'सावध तो सुखी !'

# लहान मुलांचे पान

## दोन चित्रांतील ५ फरक ओळखा



**चित्र रंगवा**



# ऑनलाईन झटपट

**कौस्तुभ ताम्हनकर**
मोबा. ९८१९७४५३९३

### दिवस पहिला

माझ्या ड्रायव्हिंग लायसन्सची मुदत सत्तावीस जुलैला संपत होती. त्याचे नूतनीकरण वेळीच करणे गरजेचे होते. या खेपेच्या ठाणेवारीत हे काम पार पाडायचेच अशा इराद्याने मी ठाण्यास पोहोचलो. सरकारी काम, ते एका खेपेत पुरे होणार नाही याची मला पुरेपुर कल्पना होती. RTO कार्यालयासमोरील एखाद्या एजंटला हे काम दिले असते तर काही सहस्त्र रुपयांच्या मोबदल्यात, फक्त त्याने सांगितलेल्या ठिकाणी सह्याकरून हे काम झाले असते आणि मी स्वत:ला न मनस्तापवता माझ्या ड्रायव्हिंग लायसन्सचे नूतनीकरण पार पडले असते. पण मला तसे करायचे नव्हते. माझ्याकडे भरपूर वेळ होता आणि हेलपाटे घालायची माझी तयारी होती.

सरकारी कामाला सुरुवात करायची तर सोमवार आणि सकाळी अकरा ही वेळ एकदम योग्य असते हे मला माहित होते. मी रिक्षा करून RTO कार्यालयाच्या आवारात पोहोचलो. वाहने, वाहन चालक शिकाऊ आणि सराईत, वाहन मालक, एजंट मंडळी, खाकी पोशाखातील साहेब लोक असे असंख्य लोक त्या परिसरात इतस्ततः फिरत होते. प्रत्येकाचे काही ना काही काम होते. प्रत्येकजण गडबडीत होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कधी एकदा येथून बाहेर पडतो असाही भाव होताच. मी तसा येथे खूप वर्षांनी येत होतो. चौकशीची खिडकी कोठे दिसते का? हे बघत मी त्या गर्दीत घुसलो. मला चौकशीची खिडकी काही सापडली नाही पण 'वाहन परवाना नूतनीकरण' अशी पाटी असलेली खिडकी दिसली. खिडकी समोर दोनचारच माणसे रांगेत उभी होती. मी रांगेत उभा राहिलो. खिडकीपर्यंत पोहोचण्याच्या आधी रांगेतच जरा चौकशी करावी असा विचार करत मी माझे तोंड उघडले. 'लायसेन्स येथेच रिन्यू होते ना?'

'ऑन लाईन करा. लगेच होईल.' असे म्हणत रांगेतील एका अनुभवी माणसाने मला खिडकीवर लटकवलेली पाटी दाखवली. त्या पाटीवर संकेत स्थळाचा पत्ता लिहिला होता.

आजकाल लिहून घेणे ही क्रिया बंद झालेली आहे. त्यामुळे पूर्वी जसे कोणाही माणसाच्या खिशात पेन हमखास असायचे तसे ते आजकाल नसते. पण माझ्याकडे होते ! मी पेन काढले आणि कागद शोधू लागलो.

'फोटो काढा.' रांगेतला एका माणूस म्हणाला. मी अजून जुन्या जमान्यातलाच गडी आहे आणि ह्या आजोबांचे काम लवकर होत नाही असेच त्या तरुणाला सुचवायचे असावे, असे मला वाटले.

तेथे दोन पाट्या होत्या. मी दोन्हीचे फोटो काढले. प्रत्येक फोटोत दोन्ही पाट्या येतच होत्या. तरी देखील मी दोन्ही पाट्यांचे दोन वेगवेगळे फोटो काढले. मागचा माणूस माझ्याकडे पाहून गालातल्या गालात हसत होता. आता माझे काम घरबसल्या होणार ह्या खुशीत मी घरी परतलो.

### दिवस दुसरा

मी माझा संगणक उघडला. माहितीच्या मायाजालात मी संगणकावर RTO च्या संकेत स्थळाचा पत्ता लिहिला. येथे देखील शोधाशोधीला पर्याय नव्हता. फक्त मैदान छोटे होते आणि मी एकटा होतो. या शोधाशोधीला सर्फिंग करणे असे म्हणतात. तर असा सरफरत मी DL म्हणजे ड्रायव्हिंग परवाना

नूतनीकरणाच्या पानावर आलो. आता ते संकेतस्थळ माझ्याशी बोलू लागले होते. इथे फक्त मुद्याचे बोलायचे असते. मी माझा DL नंबर लिहिला. मग जन्मतारीख लिहिली आणि पुढे जाण्याची कळ दाबली. मी यंत्र नाही हे संकेतस्थळाला माझ्याकडून वदवून घ्यायचे होते. त्यासाठी एका कॅपचाची योजना केलेली होती. संगणकावर दिसणाऱ्या कॅपचावर लिहिलेली अक्षरे आणि आकडे मला तसेच्या तसे लिहायचे होता. मी ते लिहायचा प्रयत्न केला. एका खेपेत येथे देखील काही साध्य होत नाही हा सरकारी कामाच्या अनुभवाचा पुन:प्रत्यय आला. एकदोनदा चुकत चुकत मी एकदाची ती सर्व अक्षरे आणि आकडे तसेच्या तसे लिहू शकलो. अर्थात हे त्या संकेतला जेव्हा पटले तेव्हा त्याने पुढचा दरवाजा उघडला. अजून काही दिवसांनी कॅपचा ओळखायचे तंत्र, यंत्र हस्तगत करेलच मग खात्यावर दुसरा मार्ग काढेल. हे कुरघोडीचे सूत्र जोपर्यंत चालू असणार, तोपर्यंत माणसाला अंत नाही.

इथून पुढे संकेतस्थळाला मी नुसते संकेत म्हणणार आहे. संकेतला माझ्याबद्दल अजून खात्री करून घ्यायची होती. DL नंबरवाला माणूस आणि मी एकच आहे ह्याची खात्री करून घेण्यासाठी संकेतने मला माझा आधार नंबर विचारला. मी तो लगेच नोंदवला. हा नंबर दुसरी व्यक्ती देखील लिहू शकते एवढे समजण्या इतका संकेत नक्कीच हुशार होता. माझ्या आधारशी जोडलेल्या मोबाईल वर एक परवलीचा नंबर (OTP) संकेतने क्षणात पाठवला. आणि आमची गाडी थांबली.

संकेतस्थळावर नोंदवलेला माझा मोबाईल नंबर आणि माझ्याकडे असलेला मोबाईल एक नव्हते. कारण माझे DL पंधरा वर्षांपूर्वी काढलेले होते. त्यावेळी माझ्याकडे वेगळाच मोबाईल होता. पंधरा वर्षात मोबाईल नंबर ही बदलायची गोष्ट नाही इतकी प्रगती झाली आहे. संकेत पाठवत असलेला OTP माझ्या जुन्या नंबरवर जात होता !

मोबाईलशिवाय नोंदणी करायची तेथे सोय होती. मला माझे आधार कार्ड जोडायचे होते. मी लगेच माझ्या संगणकावरून माझ्या आधार कार्डाची प्रत संकेतला जोडली. संकेतने मला एक संदेश पाठवला होता. तो माझ्या संगणकावर तळ टिपेत दिसत होता. तो असा होता तुमच्या आधार कार्डावर असलेल्या नोंदी आणि संकेतकडे असलेल्या नोंदी फक्त ४०% च जुळत आहेत. कृपया आपण जवळच्या RTO कार्यालयात जावे. आणि दुसरा दिवस संपला.

**दिवस तिसरा**

आज शनिवार होता पण माझ्या नशिबाने तो तिसरा शनिवार होता. आज सर्व सरकारी कार्यालये कामासाठी उघडी असतात अशा समजुतीत मी सकाळी अकराच्या सुमारास रिक्षा करून RTO कार्यालयात पोहोचलो. गर्दीने तुडुंब वाहणाऱ्या त्या आवारात आज शुकशुकाट होता. चला आज माझे काम लवकर होणार ह्या आनंदात मी त्या मैदानात प्रवेश केला. समोर चार-पाच माणसे शिळोप्याच्या गप्पा मारत उभी होती. त्यातील एकाने मला हटकले. 'काय पाहिजे.'

'भेटायला बोलावले आहे.'

'आज RTO बंद असते.'

'का?'

'शनिवार नाही का?'

'पण आज तिसरा आहे.'

'RTO सर्व शनिवार रविवार बंद असते. पण तुमचे काय काम आहे?'

तो माणूस नक्की सरकारी नोकर नसणार याची माझी खात्री झाली. मी माझ्या कामाचे स्वरूप त्याला थोडक्यात सांगितले.

'सोमवारी २४ नंबरच्या खिडकीत तुमचे काम होईल.'

या आता मी ज्या रिक्षातून आलो होतो तो रिक्षावाला दात कोरत एक पाय सीटवर घेऊन माझ्याकडे बघतच होता. हे गिऱ्हाईक नक्की परत येणार याची त्याला खात्री होती.

'चला परत.' मी रिक्षात बसल्या बसल्या बोललो.

'पहिले क्यु नाही बोला RTO मेच काम है? मुझे मालूम था शनिचर RTO बंद रहता है?' मी कांहीच बोललो नाही. शांतपणे घरी परतलो.

**दिवस चौथा**

मी २४ नंबरच्या खिडकीसमोर उभा. साहेब देखील नुकतेच येत होते. मी कांही न बोलता माझ्या मोबाइलवरील संकेतने पाठवलेल्या संदेशाचा स्क्रीन शॉट दाखवला.

'मोबाईल नंबर बदलायचा असा अर्ज लिहा आणि चार नंबरवर पाटील साहेबांकडे जा.'

'कागद मिळेल का?'

बाहेर दुकानातून घ्या. असे ते साहेब म्हणणार असे मला वाटायच्या आतच साहेबांनी झटकन एक कोरा कागद माझ्या हातात दिला. आज नेमके माझ्या खिशात पेन नव्हते !

पेन कुणाकडे मागावे? कुठे बसावे असा विचार करताना माझ्या लक्षात आले RTO च्या मागेच माझ्या कंपनीचे ऑफिस आहे. तिथेच जावे शांतपणे बसून अर्ज लिहावा झेरॉक्स काढाव्यात आणि परत यावे असा विचार करून मी साहेबांनी दिलेला कागद फडकवत माझ्या ऑफिसकडे वळलो.

अर्ज लिहिला. माझी एकूण तीन कामे होती १) मोबाईल नंबर बदलणे २) आधार अपडेट करणे ३) परवाना रिन्यू करणे. प्रत्येक कामासाठी वेगवेगळे अर्ज नकोत म्हणून मी त्याच अर्जात ही तीनही कारणे उद्धृत केली. सोबत माझ्या सध्याच्या DL ची क्ष प्रत, आधारची क्ष प्रत जोडली आणि खिडकी नंबर चार समोर उभा राहिलो.

चार नंबरची खिडकी म्हणजे सुरवातीचीच खिडकी होती. ती खिडकी नसून मोठे दोन खोल्यांचे ऑफिसच होते आणि पाटील हे तेथील मोठे साहेब होते. रांगेतील बहुतेक मंडळी चालक, वाहक, मालक होती. प्रत्येकाच्या हातात कागदाची बंडले होती.

आत गेलेला माणूस बाहेर येई तेंव्हा आतील माहोल दिसे. आत तीन साहेब कामात गर्क होते. माझ्या एवढ्या छोट्या कामासाठी एवढ्या मोठ्या साहेबांना का बरं भेटायला सांगितले असेल असा मला प्रश्न पडला. सरकारी खात्यात असल्या प्रश्नांना कांही अर्थ नसतो. २४ नंबराने सांगितले चार नंबरावर जा. तर जायचे. मनात कोणताही किंतू न आणता हुकुम पाळायचा. माझा नंबर आला.

तीनपैकी माझ्या बाजूला बसलेल्या वर्दीला मी माझा अर्ज दिला. 'नंबर बदलायचा आहे.' एवढे मी म्हणताच वर्दीला माझा अर्ज समजला. त्याने टेबला पलिकडील मोठ्या साहेबांना माझा अर्ज दिला आणि फक्त मुद्याचे बोलले – 'मोबाईल नंबर बदलायचा आहे.'

मोठ्या साहेबांनी माझ्या अर्जावर दोन मोठे चौकोन काढले छोटीशी सही केली आणि अर्ज परत दिला.

'इथे अंगठा उठवा. पहिली वर्दी.'

'मी सही करू शकतो.' माझ्या अवताराकडे बघून मी अंगठेबहाद्दर असावा असे त्यांना का बरं वाटलं असावं? सरकारच्या लेखी एकूण ड्रायव्हर जमात ही अशिक्षित असे ठरवंवूनच टाकले असावे.

कागदावरील पहिल्या चौकोनात मी अंगठा उठवला. 'इथे सही करा. अंगठा ही तुम्हीच इथे आल्याची खूण आहे !'

जास्त खोलात न शिरता मी सही केली.

दोन नंबरच्या साहेबांनी माझा अर्ज तीन नंबरच्या साहेबांकडे सरकवला. तीन नंबरचे साहेब कोपऱ्यात भिंतीकडे तोंड करून संगणकावर बसले होते. त्यांच्या बाजूला एक मोठे कपाट होते. कपाटासमोर कागदांचे गठ्ठे पसरले होते. मी जेमतेम एका पायावर ते सुद्धा कपाटाचा आधार घेत त्यांच्या बाजूला उभा राहिलो.

'OTP आला असेल. सांगा.'

'अहो माझा मोबाईल नंबरच बदलायचा आहे. OTP माझ्या जुन्या नंबर वर जाईल.'

'अरे बापरे, असं आहे का? थांबा आपण दुसऱ्या मार्गाने जाऊ.'

मला वाटलं साहेब आता उठून दुसरीकडे जातात की काय? पण त्यांचा दुसरा मार्ग हा संगणकावरच होता.

थोडया प्रयत्नाने त्यांना यश आले आणि माझ्या मोबाइलवर टुकटुक वाजले. माझ्या मोबाईलवर OTP आला होता. साहेबांच्या संगणकीय झटापटीनंतर त्यांना देखील संकेतने अडवलेच. आता पुढे काय करायचे हे कांही त्यांना माहित नव्हते. त्यांनी हात टेकले. लगेच माझ्या मोबाईलवर त्यांच्या संगणकाच्या म्हणण्याचा फोटो काढला.

'हा फोटो चार नंबरच्या गाजरे साहेबांना दाखवा.' असे सांगून माझे सर्व कागद मला परत देऊन प्रकरण टोलवले. चार नंबरवरून ज्यांनी मला २४ नंबरवर पाठवले होते ते गृहस्थ म्हणजेच गाजरे साहेब होते.

मी २४ नंबरची खिडकी गाठली. ती उघडीच होती आणि रांग नव्हती. मी सुखावलो. आता माझे काम लगेच होणर असे मला वाटले. पण खिडकीच्या आत कोणीच नव्हते. गाजरे साहेब मिटींगला गेले

शुभ दीपावली

**अॅड. राजेंद्र प्र. किंकर**

**१७६४/३, अ, 'पिनाक शिवालया'**
**ऑफिस नं. २, ब्रह्मेश्वर बाग, कोल्हापूर ४१६ ०१२**
**मोबाईल नं. ९८२२२९८६७१**

होते. 'कधी येतील.' मी शेजारच्या खुर्चीला विचारले.

'येतील.' स्थितप्रज्ञासारखे उत्तर.

'पण कधी?' मी अस्वस्थ.

'येतील मिटिंग झाली की.' निर्विकार उत्तर.

मी शांत झालो पण खिडकी सोडली नाही. खिंड लढवल्यासारखा मी खिडकी लढवत होतो. यथावकाश गाजरे साहेब आले. चार नंबरच्या संगणक साहेबांनी माझ्या मोबाईलवर काढलेला फोटो मी त्यांच्यासमोर धरला.

मुळे साहेबांनी माझी कागदपत्रे घेतली आणि ते की बोर्डवरील कळा दाबू लागले. त्यांचे काम आत्ता संपेल, मग संपेल या आशेवर मी खिडकी धरून होतो. बऱ्याच वेळानंतर गाजरे साहेब म्हणाले, 'सर्व्हर स्लो आहे. तुम्ही पंधरा वीस मिनिटांनी या.'

मी घड्याळाकडे बघितले, तर गाजरे साहेब म्हणाले, 'पावणे दोन वाजता या.'

म्हणजे मला पाउणतास काढायचा होता. इथे येणाऱ्या बहुतेक जणांना असा वेळ काढावा लागत असावा. तेथे मैदानात एक मोठी शेड होती तिच्या खाली अनेक बाके ठेवलेली होती आणि अनेक मंडळी तेथे निवांत वाट पाहत बसलेली होती. मी देखील निवांत झालो. माझ्यासमोर एक बाई दिसणारी मुलगी बसली होती. तिच्याकडे एक माणूस सतत येत होता प्रत्येकवेळी काही कागद देत होता, काही कागद तिच्याकडून घेत होता, सह्या घेत होता. मध्येच त्या बाईंना काहीतरी सांगून आश्वस्त करत होता. आणि त्या आवारातील गर्दीत लुप्त होत होता. एवढ्यात पट्टाधारी बऱ्यापैकी मोठा एक कुत्रा त्या शेडमध्ये निवांत बसायला आला. तो बसायला जागा हुडकत होता. रसिक असावा. त्याला बाई बसल्या होत्या तीच जागा आवडली असावी. बाईंना कुत्र्याची ॲलर्जी असावी. कुत्रा आपल्याच दिशेने येतो आहे असे पाहून बाईंनी त्यांची जागा बदलली. कुत्र्याने दिशा बदलली. त्याला बाईंच्या शेजारीच बसायचे होते. बाई मंडपभर फिरल्या. कुत्र्याने पिच्छा सोडला नाही. एवढ्यात बाईंचा माणूस आला. त्याला बाई दिसेनात. ह्या खेपेला त्याच्या हातात बरेच कागद होते ते सांभाळत सांभाळत तो बाईंना हुडकू लागला. त्या तिघांची पळापळी आणि हुडकाहुडकी बघत माझा टाइमपास झाला. पावणे दोन वाजले, मी चोवीस नंबरची खिडकी गाठली.

गाजरे साहेबांनी मी समोर येताच त्यांच्या समोरील कागदांच्या गठ्ठ्यातून माझा अर्ज बाहेर काढला. संगणकावर अल्पसा काळ घालवला आणि म्हणाले, 'जा आता तुमचे काम झाले आहे.'

'आता मी ऑनलाईन माझे लायसेन्स रिन्यु करू शकेन.' मी

'हो. एकदम बेलाशक.'

'रिन्यू झालेले लायसेन्स कधी मिळेल?'

'सर्व माहिती ऑनलाईन भरा. सर्व कागदपत्रे अपलोड करा. डॉक्टरांचे फिटनेस सर्टिफिकेट जोडा, ४५८ रुपये फी भरा. या सगळ्याच्या प्रिंट काढा आणि ती सर्व कागदपत्रे येथे जमा करा. मग पंधरा दिवसांनी तुमचे लायसेन्स तुमच्या पत्यावर घरी येईल.' गाजरे साहेबांनी सर्व माहिती सविस्तर दिली.

'यालाच ऑनलाईन झटपट सुविधा असे म्हणतात का?' माझा खोचक प्रश्न .

'हो.' मुळे साहेबांचे ठासून उत्तर.

'येच तू, बघतो तुला.' असा त्या उत्तरात भाव दडला असावा असे मला वाटले.

काम झटपट उरकायचे म्हणून त्याच दिवशी मी आमच्या फॅमिली डॉक्टरांकडे गेलो. माझ्या ठणठणीतपणाचे डॉक्टरांचे प्रशस्तीपत्रक मला माझ्या अर्जासोबत जोडायचे होते. पाऊस धो धो कोसळत होता. डॉक्टरांकडे हीऽऽ गर्दी. माझा ५० वा नंबर होता. ३४ वा नंबर डॉक्टरांच्या केबिनमध्ये होता तर

३५ वा पेशंट दर्दभऱ्या अवस्थेत आतला पेशंट कधी बाहेर येतो आहे याची वाट पाहत होता. आजारी लोकांना सुखावण्याचे काम डॉक्टर रंगीबेरंगी गोळ्या देऊन जलद गतीने करत होते. ४५ वा पेशंट औषध घेऊन गेला. ४६ वा कमपौन्डरकडून औषध घेण्यासाठी थांबला होता.

दवाखान्या बाहेर 'चपला बाहेर काढाव्यात' अशी पाटी असल्यामुळे दारातच चपलांचा ढीग जमा झाला होता. ४६ वा जेंव्हा बाहेर आला तेंव्हा त्याच्या लक्षात आले आपल्या नव्या कोऱ्या चपला कोणीतरी घालून गेले आहे. ४६ व्या बाई पेशंट आणि तिच्याबरोबर आलेल्या बाई सैरभैर होऊन तेवढ्या छोट्या जागेत फिरू लागल्या. त्या डॉक्टरांच्या केबिनमध्ये पण घुसल्या. कम्पौंडरीण बाहेर येऊन चपलांचा ढीग बघून गेली. ती बाहेर का आली आणि तिने कशाचा शोध घेतला हे तिचे तिला कळले का ? हा प्रश्नच होता. बहुदा ती तिच्या चपला आहेत ना हे बघून गेली असावी .

अशाही परिस्थितीत डॉक्टर रोगी तपासत होते. त्यांना आशेच्या रंगीत गोळ्या देऊन सुखावत होते. RTO च्या मैदानातील गर्दी आणि दवाखान्यातील गर्दीत फार कांही फरक नव्हता. दोन्ही ठिकाणी प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कधी एकदा इथून सुटका होते हाच भाव होता.

एकदाचा माझा नंबर आला. मी बऱ्याच दिवसानंतर दवाखान्याची पायरी चढत होतो. डॉक्टरही बऱ्याच वेळानंतर तंदुरुस्त माणूस बघून सुखावले असावेत. हसत हसत माझी चौकशी करत डॉक्टरांनी मला माझ्या तंदुरुस्त असण्याचे प्रशस्तीपत्रक दिले.

आता मला फक्त संगणकावर बसून माझी माहिती भरायची होती. हे काम कोणाचीही मदत न घेता करायचे मी ठरवले होते. पण माझे हे ठरवणे फुकाचे होते. कारण माहिती भरताना संकेत अनेक वेळा कॅपचा भरून मागायचा, अनेक वेळा OTP लिहायला सांगायचा. सगळी कागदपत्रे अपलोड करायची होती 'ये मेरे बस की बात नही ।' हे मला उमजू लागले. मग आमच्या IT तज्ञ सुनबाई माझ्या मदतीला आल्या. मुग्धाच्या व्यस्त वेळापत्रकात ती सकाळचीच वेळ माझ्यासाठी देऊ शकत होती. मला काम थांबवण्याशिवाय पर्यायाच नव्हता.

## दिवस पाचवा

मुग्धाने सूत्रे हातात घेतली. संगणक तिचे निमुटपणे ऐकू लागला. संगणकावर संकेतशी ती सहज संवाद साधू लागली. एकेका पायरीने आमचे काम पुढे जाऊ लागले. पैसे भरायच्या वेळी मात्र माझा संगणक नाटके करू लागला. माझ्या संगणकावर जो Antivirus बसवला होता तो माझ्या पैशांची खूपच काळजी करत होता. त्यामुळे त्यादिवशीचे काम आम्हाला थांबवावे लागले.

## दिवस सहावा

मुग्धाच्या संगणकावरून आम्ही RTO चे DL नूतनीकरणाचे ४५८/- रुपये भरले. माझ्या खात्यातून पैसे गेले. RTO चे app देखील पैसे मिळाल्याचे सांगत होते, पण पैसे मिळाल्याची पोहोच पावती कांही ते app द्यायला तयार नव्हते. RTO ला द्यायच्या कागदपत्रात ती पावती महत्वाची होती. शेवटी दाम महत्वाचा. सूनबाईनी मध्यम मार्ग काढला. शेवटी पावतीच्या आधीच्या संगणकाच्या स्क्रीनवर, ज्याच्यावर पैसे मिळाल्याचे स्पष्ट दिसत होते त्या स्क्रीनचा फोटो काढून त्याची क्ष प्रत कागदपत्रात जोडली. आता यासाठी परत RTO कार्यालयात जावे लागते की काय? या कल्पनेने माझ्या तर पोटात गोळाच आला होता .

आत RTO ला द्यायची सर्व कागदपत्रे तयार झाली होती. मी पुन्हा एकदा ती तपासली. तेंव्हा लक्षात आले. हेल्थ सर्टिफिकेट देणारा डॉक्टर MBBS हवा. आमचे डॉक्टर तर BAMS होते.

# आपणा सर्वांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

२७ वर्षे अभिमानाची ...
ग्राहकांच्या सेवेची !

शुभ दीपावली

MAYURESH™

Company Deals in Electro Mechanical Components and Electronics Products Since 1996. Mayuresh Technologies has made a name for itself in the list of top manufacturing of Electronic products, Dairy equipment's, Hydroponics systems in India. We are ISO 9001-2015 accredited company.

## Govardhan Milking Machine





## Smart multipurpose dung/garbage cleaning equipment



Usage -

- Picking dung from cowshed etc.
- To pick up soil/waste from your farm
- construction sites
- Handy and convenient tool for village panchayat/municipal corp. cleaning staff


## The Innovative Soilless Gardening Hydroponic Systems



Customized Photo Frames

Indoor wall green live plants frame

Green Roof



Live grass indoor or outdoor with inbuilt watering unique technology 400 x 600 mm



Partition Wall

One side or both side live plants aeroponics technology inbuilt watering



Green Wall

Green live wall with wickpots technology less maintenance system

Hanging system with wickpots in various size & shape.
Customization possible



Hanging Garden

Commercial Hydroponics Systems











**मयुरेश टेक्नॉलॉजीज प्राइवेट लिमिटेड**
3/8 पोस्टल कॉलनी,पाचगांव,कोल्हापूर,महाराष्ट्र,इंडिया -416013
+91-9371921349 / +91-9371105750
वेबसाईट - www.mayureshtech.in




# HOME LOAN WITH ATTRACTIVE BENEFITS

- Low rate of interest
- Longer repayment period upto 30 Years
- Facility of online loan sanction available

LIC HFL
LIC HOUSING FINANCE LTD

| | | |
|---|---|---|
| HOME LOAN | LOAN AGAINST PROPERTY | LOAN FOR COMMERCIAL PROPERTY |
| LOAN AGAINST RENT RECEIVABLE | LOAN FOR BUILDERS & DEVELOPERS | LOAN FOR PLOT PURCHASE |
| LOAN TO PENSIONERS | QUICK SANCTION | EASY & HASSLE FREE DOCUMENTATION |

**GDK ENTERPRISES**
*Smart Service Solution*
web.gdloan.in

G. D. Kulkarni
Member - MDRT (USA) & Club Galaxy
Email : govindkparth@gmail.com

Sarang G. Kulkarni
BE , MBA (Finance & Marketing)
NISM Certified
Email : sarangparth@gmail.com

**F-2, Laxmi Apartment, 1383c, Sangar Galli, Opp. Padmaraje Girl, Highschool, Kolhapur.**
**Office Ph.: 0231-2625587, 2621779, 9179395050**

सरकार डॉक्टर-डॉक्टरात भेदभाव का करते? दोघांच्याही पदव्या सरकारनेच दिलेल्या असतात. MBBS डोक्टराना हेल्थ सर्टिफिकेट देण्याचे वेगळे प्रशिक्षण दिले असते की काय याचा शोध घ्यायला हवा.

BAMS डॉक्टर ज्यांच्याकडून मी हेल्थ सर्टिफिकेट घेतले होते, त्यांच्या दवाखान्यात पेशंटची तुफान गर्दी होती, तर RTO च्या दारात MBBS डॉक्टर शिक्का घेऊन सही देण्यासाठी आणि पैसे घेण्यासाठी बसला होता. एका अंशाने (degree) माझा अर्ज फेटाळला जाऊ शकत होता. सहा दिवसाच्या माझ्या मेहनतीवर मला पाणी सोडायचे नव्हते .

मी परत A 1 फॉर्मची एक प्रत काढली. MBBS डॉक्टरकडून त्यावर सही घेतली. साईटवर अपलोड केलेले पहिले हेल्थ सर्टिफिकेट काढून तिथे हे नवे हेल्थ सर्टिफिकेट जोडता येते का नाही या किड्याने मी अस्वस्थ होतो. मुग्धाने हे काम लीलया केले.

घड्याळात एक वाजून वीस मिनिटे झाली होती. एक दिवस वाचवायचा तर सर्व कागदपत्रे दोन वाजायच्या आत RTO च्या कार्यालयात देणे गरजेचे होते. मी धावतच रिक्षाने RTO गाठले.

चोवीस नंबरच्या खिडकीसमोर थोडेच लोक उभे होते. मी माझा डबा दोन वाजायच्या आत रांगेच्या गाडीला जोडला. आता मला घड्याळाच्या काट्यांची भीती नव्हती. माझे कागद मी खिडकीतून आत सरकवले. पलीकडील ललना कागदपत्रे तपासू लागली.

'हेल्थ सर्टिफिकेट फारच अस्पष्ट आहे.'

'म्हणून तर मूळ प्रत सोबत जोडली आहे.' मी ठामपणे म्हणालो .

मग त्या बाईनी फार कांही प्रश्न विचारले नाहीत. पैशांची पावती छापली जात नाही हे त्यांना माहित असावे.

MBBS डॉक्टरच्या सर्टिफिकेटवर Received असा शिक्का मारून मला ते सर्टिफिकेट परत देण्यात आले. क्षणभर मी चक्रावलोच ! माझी सर्व कागदपत्रे ती बाई परत करते की काय? अशी मला शंका चाटून गेली.

मी 'हे काय?' असा बावळट प्रश्न मी विचारला.

'तुमची सर्व कागदपत्रे मिळाल्याची ती पावती आहे. पोलिसाने अडवले तर हा कागद दाखवा. वीस दिवसात लायसेन्स घरी येईल.'

मी मला मिळालेल्या पावतीकडे बघतच बसलो.

रांगेतील अनुभवी माणसे म्हणाली, 'जा आता. तुमचे काम झाले आहे.'

मी तो टेम्पररी परवाना खिशात घातला. पोलीस मला पकडणार नाहीत याची मला खात्री होती. कारण माझ्याकडे ना चार चाकी गाडी होती ना दुचाकी आणि मी आताशा वाहन चालवणे सोडूनच दिले होते.

वीस दिवसात येणारा परवाना सातव्याच दिवशी घरात आला. सरकार दरबारी ऑनलाईन झटपट कशाला म्हणतात ते समजले. ज्याचा शेवट गोड ते सर्व गोडच गोड म्हणतात ते खरेच आहे.

मी सात दिवसांचे कष्ट क्षणात विसरून गेलो !


**कौस्तुभ ताम्हनकर**

kdtamhankar@gmail.com


***


गर्दी नसलेले एकमेव ठिकाण

**''माहेर- गावाकडंच घर''**

सासवणे - अलिबाग

संपर्क :-९९६७०६८२४६

भेटा- (Visit) :- www.mahertrip.in

# समर्पण - संत कान्होपात्रा

•

**सौ. मंजुश्री गोखले**
मोबा. ८८०५३५५२००



कान्होपात्रा - विठ्ठलाला पडलेलं एक गोड स्वप्न असं तिचं वर्णन आहे. 'शामा' या नायकिणीची ती मुलगी होती. शामाची आई माया ही सुद्धा नायकीणच होती. नायकीण म्हणजे नृत्य गायन करून आपला चरितार्थ चालवणाऱ्या आणि आयुष्यभर एकाच पुरुषाला धरून राहणाऱ्या स्त्रिया. मायाचा हा परंपरागत व्यवसाय होता. तिची मुलगी शामा वयात आली तेव्हा परंपरेप्रमाणे मायाने तिची बोली लावली. शामासुद्धा दिसायला सुंदर होती. नृत्य गायन कलेत निपुण होती. या बोलीत जो सर्वात जास्त रक्कम बोलेल त्याच्याकडे शामा सुपूर्द केली जाणार होती. शामाच्या या बोलीला मंगळवेढा परिसरातील अनेक सरदार, श्रीमंत व्यापारी आले होते. शामाची ही बोली मंगळवेढ्याचा नगरशेठ सदाशिव मालगुजर याने जिंकली. सदाशिव मालगुजर हा बिदरचा सुलतान याचा विश्वासू वसुली अधिकारी होता. शामाची बोली त्याने जिंकल्यावर शामा त्याची झाली. या शामाला जेव्हा डोहाळे लागले तेव्हा सदाशिवने ते अत्यंत कौतुकाने पुरवले. याच शामा नायकिणीच्या पोटी कान्होपात्रेचा जन्म झाला.

नायकिणींच्या परंपरेत मुलगी जन्माला येणं आणि ती सुद्धा अत्यंत देखणी ही एक लॉटरीच होती. कान्होपात्रेचं बालपण अत्यंत श्रीमंतीत आणि सुखात गेलं. तिला सांभाळण्यासाठी ठेवलेली एक किसाबाई नावाची प्रौढा विठ्ठलभक्त होती. सदाशिवच्या घरात ही पंढरीची वारी होती. किसाबाई लहानग्या कान्होपात्राला पुराणातील कथा, संतांच्या गोष्टी सांगत असे. संतांचे अभंग गाऊन तिला निजवत असे. याचा परिणाम असा झाला की, कान्होपात्राचे विचार वेगळे झाले.

घरातील परंपरेप्रमाणे कान्होपात्रेला नृत्य गायनात पारंगत करण्यासाठी गुरु नेमण्यात आले. तिच्यासोबत त्या गुरुंची कन्याही नृत्य शिकत असे. दोघींची छान मैत्री झाली. कान्होपात्रा अत्यंत देखणी होती. तिची कांती इतकी नितळ होती, की विडा खाल्ला तर विड्याची लाल पिंक तिच्या गळ्यातून उतरताना स्पष्ट दिसत असे. तिची मैत्रीण कान्होपात्रेच्या नायकिणीच्या परंपरेपासून अनभिज्ञ होती. ती नेहमी कान्होपात्रेला म्हणत असे की, 'तू इतकी सुंदर आहेस, तर जगातल्या सर्वात सुंदर पुरुषाशी तू विवाह कर.' आणि रुक्मिणी स्वयंवराची कथा कान्होपात्रेला सांगताना किसाबाईने सांगितले की श्रीकृष्ण हा सर्व जगात सुंदर पुरुष आहे आणि विठ्ठल हे त्या श्रीकृष्णाचेच सुंदर प्रतिरूप आहे. या दोन सिक्वेन्समुळे अबोध कान्होपात्रानं मनाशी पक्कं ठरवलं की मी विठ्ठलाशी विवाह करणार. तो जगातला सर्वात सुंदर पुरुष आहे आणि ही भावना कान्होपात्राच्या मनात इतकी रुजून बसली की त्या अबोध वयापासून कान्होपात्रा विठ्ठलाला आपला पतीच मानू लागली. त्याच्यासाठी साज-शृंगार

**पान ९९ वर पहा...**

# नकारात्मकतेचा भस्मासूर

**प्रसाद मोकाशी**
मोबा. ९८६९०२०७२०, ९३२६०९६३१७



आपल्या देशात, राज्यात आणि शहरात सर्वांनाच एका मोठ्या समस्येने ग्रासले आहे. अर्थात ही समस्या अचानक निर्माण झालेली नाही. अनेक पिढ्या या समस्येच्या मिठीतून सुटल्या असल्या तरी सध्या या समस्येने सर्वांनाच म्हणजे अस्तित्वात असलेल्या मध्यमवयीन आणि प्रामुख्याने तरूण पिढीला ग्रासले आहे. जणू सूर्याला राहू-केतूने गिळंकृत करावे, त्याप्रमाणे या समस्येने तरुण, मध्यमवयीन, पुरूष-महिला यांना पार आपल्या कह्यात घेतले आहे. स्वाभाविकच यातून सुटण्याची धडपड सर्वांची आहे. मात्र त्याचे मार्ग काहीसे तोकडे असल्याने किंवा त्या मार्गांबाबत वैचारिक गोंधळ असल्याने समस्या अधिकाधिक जटील होऊन बसली आहे.

ही सामाजिक समस्या केवळ एकाच पातळीवर नाही, तर सर्वच पातळीवर उद्भवली आहे. या समस्येचे नाव आहे निराशा, नैराश्य. प्रत्येक व्यक्तीला वेगवेगळ्या प्रकारच्या नैराश्याने घेरले आहे. आपण ज्या क्षेत्रात आहोत त्या क्षेत्रामध्ये आपल्या मनासारखे घडले नाही तर लगेच येणारे नैराश्य अनेकदा जीवनामध्ये टोकाची भूमिका बजावत असते आणि त्यातूनच अति टोकाची पावले

उचलल्याशिवाय पर्याय रहात नाही, अशी परिस्थिती निर्माण होते. मात्र तसे प्रत्येकवेळी होतेच असे नाही. ज्यांच्याकडून योग्य मार्गदर्शनाची अपेक्षा असते त्यांच्याकडूनच अनेकदा अयोग्य पावले उचलली जातात आणि तोच योग्य पर्याय म्हणून अनुयायीही त्याच मार्गाने जाताना दिसतात.

आपण अडीच दशकांपूर्वी एकविसाव्या शतकामध्ये प्रवेश केला, तेव्हा संपूर्ण विश्वाच्या विकासाचा, प्रगतीचा आणि मुख्य म्हणजे विचाराचा वेग हा मानवी होता. मानवाने संशोधनामध्ये प्रगती केली. वैज्ञानिक संशोधनातून भौतिक सुखाचा सोपा मार्ग शोधण्यात आला. स्वाभाविकच सर्व काही हाती सुखाने आल्यावर मानवाची विचारशक्ती दुबळी झाली आणि रिकामे डोके सैतानाचे घर होण्यास वेळ लागला नाही. विविध प्रश्नांवर केवळ आत्मिक आणि वैयक्तिक सुखाचाच विचार होऊ लागला आणि एक वैचारिक गोंधळ सुरू झाला. सामाजिकदृष्ट्या या विचाराला चंगळवाद असे नाव देण्यात आले.

भौतिक आणि ऐहिक सुखाच्या मागे माणूस धावू लागला तो काही एकविसाव्या शतकापासून नव्हे. पण त्याच्या धावण्याचा वेग वाढला तो या शतकापासून जागितिकीकरणामुळे आणि खुल्या अर्थव्यवस्थेमुळे. प्रत्येकाच्या हातात पैसा मोठ्या प्रमाणात खेळू लागला आणि प्रत्येकाला सुखासीन आयुष्याची स्वप्ने अस्तित्वात येण्याची स्वप्ने पडू लागली. त्याचवेळी वैयक्तिक, आर्थिक सुबत्तेची स्पर्धा सुरू झाली आणि मग केवळ वैयक्तिक, सुखासीन विचार अंगवळणी पडायला लागला. रिकाम्या डोक्यांमध्ये देव, धर्म, जात, प्रांत आणि मी याचाच विचार खेळू लागला आणि परिणामी सामाजिक, सामूहीक विचारांची प्रक्रिया मागे पडू लागली. अनेक वर्षांपूर्वी काही समाजशास्त्रज्ञांनी असे म्हटले होते की, आता वर्चस्ववादासाठी हत्यारे घेऊन युद्ध करण्याची वेळ मागे पडली असून वैचारिक गोंधळ निर्माण करून युद्धे खेळली जातील आणि वर्चस्वाच्या लढाईत केवळ एकाच विचारांचा विजय होईल. तो विचार म्हणजे मी, माझे, माझ्यापाशी आणि माझ्यासाठी. आता ही भविष्यवाणी सत्यात येत असून प्रत्येकजण परिस्थितीच्या विळख्यात अडकला जात आहे.

आपल्या राज्यात आणि शहरात नव्हे तर संपूर्ण देशातील सामाजिक परिस्थिती नकारात्मक विचारांनी वेढली गेली आहे. अर्थात संपूर्ण नकारात्मकता आहे, असे समजून घेण्यासारखी परिस्थिती नसली तरी समाजमाध्यमे, मनोरंजन क्षेत्रे, संवाद माध्यमे ही सारी केवळ आणि केवळ नकारात्मकतेवर भर देत चालली आहेत. लोकांना हेच वाचायला, बघायला, पहायला आवडते म्हणून आम्हीही त्यांना हेच देतो, असे सांगण्यात येत आहे. याचा परिणाम काय होतो हे आपण दररोज पहात आहोत. अगदी लहान मुलांना हातात मोबाइल देण्याबाबत आणि न देण्याबाबत जो संघर्ष दोन पिढ्यांमध्ये पहायला मिळतो तोही या नकारात्मकतेचा भाग आहे, असे मला वाटते.

काही वर्षांपासून परिक्षेत अपयश आले, प्रेमात अपयश आले, जीवनात अपयश आले तर लगेच आत्मघातासारखे पाऊल उचलताना आपण तरूण पिढीला पहात आहोत. जीवनातील अशा अपयशाला किंवा अशा परिस्थितीला तोंड द्यायला तरूण पिढी सज्ज नाही का? केवळ पैसे दिले किंवा एखाद्याला आपण काही देऊ केले की झाले, असा समज तरूण पिढीचा कोणी करून दिला, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. आपण आपल्या मनोरंजनासाठी चित्रपट किंवा मालिका पाहतो. सध्या विविध वाहिन्यांवर दाखविण्यात येणाऱ्या मालिका

किंवा चित्रपट (अगदी डब केलेले दाक्षिणात्य चित्रपटसुद्धा) कोणता सकारात्मक विचार आपल्यापुढे मांडताना दिसतात? कोणतीही मालिका घ्या. अनैतिक संबंध, कौटुंबिक वाद, सामाजिक-राजकीय संघर्ष आणि एकमेकांवरील कुरघोडी यांनी भरलेल्या या मालिका दररोज सायंकाळी घराघरांमध्ये घुसलेल्या असतात. सायंकाळी कामावरून किंवा शाळा-महाविद्यालयांतून घरी परतल्यावर मनोरंजनासाठी असलेल्या साधनांपुढे बसल्यावर अशा नकारात्मक विचारांच्या मालिका पाहण्यास सुरुवात केली तर मन दिवसभराच्या अशांततेनंतर शांत होण्याऐवजी आणखी अशांत झाले नाही तरच नवल! धुम्रपान करणे, मद्यपान करणे आरोग्यास धोकादायक आहे, अशी वैधानिक सूचना बारीक अक्षरांमध्ये दाखवली, म्हणजे आपली इतिकर्तव्यता संपली असे जर निर्मात्यांचे म्हणणे असेल तर ते अयोग्य ठरेल. मन अशांत झाले की मद्यपान केलेच पाहिजे असे हल्ली समाजमान्य आहे. स्वाभाविकच मिळेल ते मद्य आपल्या आर्थिक कुवतीनुसार पिणे हेही सर्वमान्य झाले आहे. मात्र मद्य प्याल्यानंतर कौटुंबिक हिंसाचार करणे हे योग्य आहे का? अशा हिंसाचारामध्ये नेमकं बळी कोण पडतं. मद्याची नशा उलटल्यानंतर आत्मघात करून घेणारे अगोदर विचार करत नाहीत, कारण त्यांना नकारात्मक परिस्थितीने ग्रासलेले असते.

कोणत्याही नात्यांमध्ये संवाद असतो पण विसंवाद नसतो. मात्र वाहिन्यांवरील मालिकांमधील नाती ही केवळ आणि केवळ विसंवादासाठी आणि एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठीच जन्माला आली आहेत की काय असे वाटत राहते. एका मध्यमवर्गीय घरातील उदाहरण त्यासंदर्भात द्यावेसे वाटते. त्या घरामध्ये तीन पिढ्या नांदत आहेत. सर्वात ज्येष्ठ पिढीमध्ये असणारी व्यक्ती आपल्या पुढच्या पिढीपासून काहीशी अलिप्त झाली आहे. स्वभाव गुण असेल नाहीतर आणखी काही. पण त्या व्यक्तीशी घरातील कोणीही बोलत नाही. आता ती व्यक्ती आपले मन रिझविण्यासाठी सतत दूरदर्शनच्या पडद्यासमोर बसलेली असते. त्यातील सासू-सुनांचा होणारा संघर्ष पाहून त्यांनाही आपली सून तशीच वागते, असे वाटू लागले आहे. त्यामुळे त्यांचा सुनेशी संवाद खुंटला आहे. त्यांची नातवंडे आपल्या शैक्षणिक आयुष्यात मग्न असली तरी त्यांचा बहुतांश वेळ हा केवळ मोबाइलमध्ये डोके खुपसून बसण्यात जातो. त्यांना विशेष मित्र-मैत्रिणी नाहीत आणि लहानपणापासून त्यांना आपल्या आजूबाजूचा परिसर हा वाईट लोकांचा आहे, तुम्ही मोबाइल बघा, त्यातील खेळ खेळा असे वारंवार बिंबविण्यात आल्यामुळे या मुलांना संवाद म्हणजे काय हेच कळत नाही. स्वाभाविकच तीन पिढ्यांची तोंडं चार दिशांना झालेली आहेत. मात्र असे काही झाले आहे, हे त्यांना सांगूनही पटत नाही किंवा कळून घ्यायचे नाही. ही मानसिकता नकारात्मक नाही का? त्यावर उपाय काय असेल हे शोधणे समाजशास्त्रज्ञांचे काम आहे.

परीक्षेत अपयश आल्यावर तात्काळ आत्महत्येसारखे पाऊल उचलणे किती धोकादायक असते, हे तरूण पिढीला समजावून सांगणे गरजेचे झाले आहे. अपयश ही यशाची पहिली पायरी असते, हे अनेक शतके वापरून गुळगुळीत झालेले वाक्य आपण परीक्षेनंतर अनेकांच्या तोंडून ऐकतो. पण समाज काय म्हणेल या भीतीने पालक मंडळी आपल्या मुलांना सावरण्यात कमी पडतात, हे लक्षात येत नाही. दरवर्षी आपला मुलगा परीक्षेत उत्तीर्ण होतो म्हणजे त्याने कधीच अपयश पाहता कामा नये ही अपेक्षा योग्य असली तरी त्याच्या मानसिकतेचा विचार न करता एकदा अनुत्तीर्ण झाला म्हणून त्याचे सर्व मित्र तोडणे, त्याला मन रिझविण्याची जराही संधी न देणे, त्याने केवळ अभ्यास करत बसणे,

त्याला कौटुंबिक कार्यक्रमामध्ये सर्वांसमोर घालून पाडून बोलणे हे योग्य आहे का? याचा विचार होताना दिसत नाही. स्वाभाविकच तरूण वयामध्ये असा होणारा अवमान जिव्हारी लागतो आणि मग पाऊल उचलले जाते ते टोकाचे - आत्महत्येचे ! ही नकारात्मक मानसिकता थांबविण्यासाठी काही उपाय योजणे आवश्यक आहे.

विविध वाहिन्यांवर दाखविण्यात येणाऱ्या मालिकांमध्ये जे योग्य संदेश दिले जातात ते विचारात न घेता त्यातील भडक दृष्ये लक्षात ठेवली जातात. याचे अत्यंत ताजे उदाहरण अलिकडेच पुण्यातील एका क्लासमध्ये घडले आणि त्यातून एका मुलीचे शिक्षण बंद झाले. हे दुर्दैवी आहे. प्रसंग नेमका काय होता हे जाणून घेतले तर त्यात चूक कोणाची हे शोधता येईल. त्याचे झाले असे.

साधारण नववीमध्ये शिकत असलेल्या त्या मुलीच्या हातात असलेल्या स्मार्ट मोबाइलमध्ये असणारी विविध एप्स पाहताना तिच्याच वर्गातल्या मुलाने तिला एक संवादाचे एप सुरू करून दिले आणि तिला त्यावर आपण गप्पा मारू असे सांगितले. मात्र हे आपण सुरू करून दिल्याचे कोणाला सांगू नये अशी अट त्याने तिला घातली. त्यांचा हा संवाद त्याच वर्गातील एका अन्य मित्राने ऐकला आणि त्याने त्या मुलास ब्लॅकमेल करायला सुरुवात केली. मला मोटरसायकल घ्यायची असून तू मला २५ हजार रुपये आणून दे, अन्यथा हे मी सर्वांना सांगेन, अशी धमकी त्याने दिली. धमकी देणारा एका घरकाम करणाऱ्या आणि रोजंदारीवर पोट असलेल्या कुटुंबातील होता. मात्र नववीत शिकत असणाऱ्या त्या मुलाला मोटरसायकल हवी आणि ती देण्यास आपले पालक सक्षम नाहीत, ही अक्कल त्याला नक्की होती. त्याने दिलेली धमकी संबंधित मुलाला पूर्ण करणे शक्य झाले नाही. यावर त्याने त्या मुलास पुन्हा धमकावले. सुदैवाने त्यांच्याच वर्गातील एका मुलाने ते ऐकले. त्याने पैसे देण्याची तयारी दाखवली. मात्र आपले संभाषण त्याने मोबाइलमध्येच रेकॉर्ड केले आणि आपल्या शिक्षकांना पाठवले. शिक्षकांनी त्याची दखल घेत जेव्हा याची चौकशी केली तेव्हा सर्व प्रकार उघडकीस आला. हे सर्व तू कसे केले असे धमकी देणाऱ्या मुलास विचारले तेव्हा त्याने आपण क्राईम पेट्रोल पाहून हे केले असे स्पष्ट सांगितले. अर्थात त्याला शिक्षा काय झाली हे कळले नाही, पण या प्रकरणातील मुलीची काहीही चूक नसताना तिची शाळा आणि क्लास सुटला. पर्यायाने तिचे शिक्षण थांबले.

चूक कोणाची, शिक्षा कोणाला. यातून ती मुलगी किंवा तिचे पालक नकारात्मक विचार करणार नाहीत का, याचा विचार कोणी करायचा हा प्रश्न आहे. पुणे, नागपूर, सांगली, नवी मुंबई या शहरांमध्ये अलिकडेच एकतर्फी प्रेमातून झालेल्या हत्या हे मुठीत आलेल्या जगाचाच दुष्परिणाम आहे. त्याचा योग्य वापर कसा करायचा हेच पहिल्या पिढीला कळले नाही त्यामुळे त्यांनी आपला त्रास वाचविण्यासाठी पुढच्या पिढीच्या हाती मोबाइल सोपविला आणि नकारात्मकतेचा जन्म झाला असे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

आणखी एक उदाहरण आपल्या पुण्यनगरीतलंच आहे. परंतु असे प्रकार केवळ पुण्यनगरीतच होतात आणि इतर शहरे चांगली आहेत, असे नाही तर अलिकडेच हे प्रकार पुण्यनगरीत घडले असल्याने त्याचे उदाहरण देत आहे. एका मुलीला तिच्या कॉलनीतच राहणाऱ्या तिच्या परिचित मुलाने फेसबुकवर मैत्री करण्याची रिक्वेस्ट पाठवली. तिच्या आईने तिला ती स्वीकारण्यास सांगितले. बरेच दिवस त्या दोघांचे परस्परांशी संवाद सुरू होते. चांगल्या गोष्टी

एकमेकांना ते पाठवत होते. एक दिवस त्या मुलाने तिला भेटण्यासाठी बोलावले. आपण शाळेत जाताना रोज भेटतोच मग पुन्हा त्याने अशी विनंती का केली असा त्या मुलीला प्रश्न पडला. तिने त्याबद्दल आपल्या आईला सांगितले. इतके दिवस त्यांच्या या फेसबुक मैत्रीला पाठिंबा देणाऱ्या त्या मुलीच्या आईने तात्काळ कोणताही विचार न करता त्या मुलाच्या विरोधात पोलीस तक्रार केली आणि तो आपल्या मुलीला अश्लील मेसेज पाठवतो असे सांगितले. मुलीच्या आईची तक्रार आहे म्हणून पोलिसांनीही त्या मुलाच्या विरोधात पावले उचलत त्याच्यावर गुन्हा दाखल केला. त्या दोघांचे संभाषण तपासून पाहण्यात आले आणि नंतर त्या मुलाला सोडून देण्यात आले. नेहमी भेट होत असताना तिला पुन्हा फेसबुकवरून भेटीस का बोलावले, असे पोलिसांनी विचारले तेव्हा माझ्या एका मित्राने सांगितले म्हणून मी तिला विचारले, असे उत्तर त्याने दिले. तो मित्रही त्यांच्याच वयाचा होता. पण वाहिन्यांवर पाहून त्याने तिचे तुझ्यावर किती प्रेम आहे आणि किती मैत्री आहे हे तपासण्यासाठी असा सल्ला दिला होता. पोलिसांनी त्यांनी असा अविचार करू नये, यासाठी योग्य पद्धतीने प्रकरण हाताळत त्या दोन्ही मुलांची पाठवणी केली. आता या प्रकरणामध्ये पुन्हा बळी पडली ती मुलगीच. तिचे तिच्या कॉलनीमध्ये सर्वांमध्ये मिसळणे बंद झाले. वारंवार तिच्या घरातले तिच्यावर पाळत ठेवू लागलेच पण तिच्या मनमोकळ्या स्वभावावर टीका करू लागले. ती मुलगी पूर्णपणे अंतर्मुख झाली. नकारात्मकतेची अशी अनेक उदाहरणे देता येतील.

सध्याचे म्हणजे साधारण १९९० नंतर आलेले चित्रपट हे केवळ मारधाडीचे नाहीत तर काहीही करून आपल्याला समोरच्या व्यक्तीला आपलेसे करायचे आहे या इर्षेने पेटलेल्या व्यक्तिरेखांचे उदात्तीकरण करणारे आहेत. प्रेम, पैसा किंवा प्रसिद्धी ही मिळविण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाणारे चित्रपट तरूण पिढीला अधिकाधिक आकर्षित करत आहेत. स्वाभाविकच एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हत्या, आत्महत्या, समाजात अयशस्वी झाल्यावर येणारे नैराश्य झटकता न आल्याने केलेला आत्मघात याला प्रोत्साहन अशाच चित्रपटांमधून मिळत आहे, ही चिंतेची बाब असून याकडे म्हणावे तितके लक्ष देण्यात येत नाही.

नागपूर, पुणे, मुंबई किती शहरांची नावे घ्यायची, जिथे एकतर्फी प्रेमातून हत्या आणि आत्महत्या होत आहेत. अल्पवयीन मुलांच्या हातात गाड्या दिल्या जात आहेत आणि पोलिसांनी पकडल्यावर आपल्या मुलांनी शौर्य गाजवले या आविर्भावात पालक मुलांना जामिनावर सोडवून घरी आणत आहेत. पुरावे बदलण्यासाठी आई-वडील पुढाकार घेत आहेत. त्यांना राजकारण्याचा वरदहस्त आहे आणि पैसा ओसंडून वाहत आहे. कोणाचा आदर्श घेताहेत ही मंडळी, याचा विचार करायची वेळ आली आहे. ही सर्व परिस्थिती केवळ आणि केवळ नकारात्मक वातावरण निर्माण करत आहे. तुम्हाला तसे वाटत नाही का?

तीच परिस्थिती आहे सध्याच्या समाज-माध्यमांची. साधारण गेल्या दशकाच्या सुरुवातीला करलो दुनिया मुठ्ठी में चे स्वरूप वेगाने बदलू लागले. सगळे काही आपल्या हाताच्या मुठीत आले आणि सगळेच बदलले. या माध्यमाचा उपयोग चांगल्या आणि योग्य कामासाठी होईल असे सांगण्यात येत होते. पण माकडाच्या हातात कोलित दिल्यावर घरे ही पेटणारच ना. इथेही तेच घडत गेले आणि कोणाच्याही लक्षात येण्यापूर्वीच संवादाची जागा वितंडवादाने घेतली. संवादाची भाषा बदलली, संवादाची लिपी बदलली, संवादाची अक्षरे बदलली.

दररोज सकाळ, संध्याकाळ शुभ संदेश पाठवणे हक्काचे झाले. ते पाठवले नाहीत तर जगाचा पूर्ण विनाश होतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. आपल्या भावना या तात्काळ संबंधितांना कळल्या पाहिजेत, असा दुराग्रह मनात पक्का झाला आणि प्रत्येकजण इतरांना वेठीस धरू लागला. फेसबुकपेक्षा व्हॉटस अप आणि त्यापेक्षाही ट्विटर (म्हणजेच एक्स) आणि इन्स्टाग्राम अधिक घातक ठरू लागले. समोरची व्यक्ती नेमकी कुठे आहे, कोणत्या परिस्थितीत आहे, याचा विचारही बाजूला सारला गेला आणि वेळेत प्रतिसाद दिला नाही तरी रागावणे, निराश होणे किंबहुना नैराश्यातून आत्महत्या करण्याकडे तरूणाई वळू लागली. रिल्ससाठी जीव धोक्यात घालू लागली. इतकेच नव्हे तर समाजमाध्यमांवर मिळणारा प्रतिसाद चुकीचा असला किंवा घाईगडबडीत चुकला तर त्यावरून संबंध तोडले जातात. इतके तकलादू आपले हितसंबंध असतात का? याचाही विचार करण्याइतकी संबंधितांची सदसदविवेकबुद्धी शाबूत राहिलेली नसते. अनेकदा पाठविण्यात येणारे लघुसंदेश समजून न घेता त्याचा विपरीत अर्थ तात्काळ काढला जातो आणि संबंधांना अनैतिक, एकतर्फी वेगळे वळण लागते. अर्थात मैत्री, मित्रता सगळे काही बाजूला पडते. समाजात अनैतिकता बोकाळण्याला समाजमाध्यमांचा अति आणि चुकीचा वापर कारणीभूत आहेच, पण त्यामुळे निराशेचे ढग अधिक काळवंडताहेत. हेच तंत्रज्ञानाच्या आहारी गेलेल्यांच्या ध्यानात येत नाही.

या सगळ्या विज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे आपण नैराश्याच्या गर्तेत जात आहोत, असे वाटत असताना अध्यात्माची वाट चोखाळणारे अनेक आहेत. ती वाट योग्य असली (हा वादाचा मुद्दा होऊ शकतो) तरी त्यासाठी योग्य आणि खऱ्या अर्थाने वास्तववादी विचारांची कास धरणारा विज्ञानवादी-अध्यात्मवादी, गुरू भेटण्याची गरज आहे. मात्र येथेही अनेकांच्या पदरी निराशा आल्याखेरीज रहात नाही. आपल्या समस्येवर योग्य पर्याय सुचविणारी व्यक्ती, पंथ मिळावा म्हणून अनेकजण विविध ठिकाणी ऐकीव माहितीच्या आधारे फिरत असतात. त्यांच्या अज्ञानाचा, असहाय्यतेचा फायदा उठविणारे, आर्थिक आणि शारीरिक शोषण करतातच पण मूळ समस्येपासून त्यांना भरकटवतात. गेल्या काही वर्षात अशा अनेक भोंदू बाबा, महाराज, बापूंची रवानगी तुरूंगात झाली आहेच, पण काही जणांचे अचानक महत्व कमी झाले आहे. काही पंथांच्या किंवा विचारांच्या महाराजांनी स्वत:च निराश होत किंवा स्वत:च्या गैरव्यवहारामुळे लागणाऱ्या पोलिसांच्या ससेमिऱ्याला घाबरून आत्मघात करून घेतला आहे.

अध्यात्म ही एक वेगळी शक्ती आहे, त्याला बाजारबसवीचे रूप देऊ नये असे संतमहात्म्यांनी सांगूनही भोंदू चमत्कारांच्या आधारे अज्ञानी, समस्याग्रस्तांना चुकीच्या मार्गावर नेणारी मंडळी आज समाजात नकारात्मकतेचे बीज पेरत आहेत. अनेक कथित अध्यात्मवादी सरकारी आश्रयाला गेले आहेत. राजकारणी मंडळींचे धार्मिक सल्लागार म्हणून मिरविण्यात त्यांना मोठेपणा वाटतो. याचा लाभ राजकारण्यांनी उचलला नाही तरच नवल. त्यामध्ये कोण्या एका राजकारण्याचा किंवा राजकीय पक्षाचा उल्लेख करून चालणार नाही. सगळेच एका माळेचे मणी आहेत. लोकानुनय करण्यासाठी स्थानिक बाबा, महाराजांपुढे लोटांगण घालणारी राजकारणी मंडळी जनतेपुढे कोणता आदर्श ठेवतात, हा प्रश्न कोणीही विचारत नाही हेच आपण सगळे निराशेच्या गर्तेत गेल्याचे द्योतक आहे. किमान जनतेचे, समाजाचे, पर्यायाने या राज्याचे, देशाचे प्रतिनिधीत्व करू पाहणाऱ्या लोकप्रतिनिधींनी तरी हे निराशेचे ढग

पांगवण्याचा, नकारात्मकतेचा अंधार दूर करण्यासाठी प्रयत्न करायला हवा. पण तीही आपणासारखी माणसे आहेत, त्यांनाही भाव भावना आहेत आणि त्यांनीही निवडून येण्यासाठी अनेक प्रकारे प्रयत्न केलेले आहेत. त्यांनी केलेले प्रयत्न पाहिले की सर्वसामान्य अधिक निराश होणे स्वाभाविक आहे.

अशा निराशाजनक परिस्थितीमध्ये समाजाला दिशा देण्यासाठी राजकीय व्यक्तींनी पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे, मात्र त्या पातळीवर वेगळेच दुर्दैवी चित्र दिसू लागले आहे. रिकाम्या डोक्यांना भडकावून रिकाम्या हाती विध्वंसासाठी शस्त्रे देण्याऐवजी रिकामी डोकी योग्य मार्गावर यावीत, यासाठी रिकाम्या हातांना विधायक कार्याकडे वळविण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. जातीपातीचे राजकारण, आरक्षणाचे आमीष आणि केवळ झुंडशाही यांच्याकडेच बेरोजगार, सुशिक्षितांचा कल वळताना दिसतो. आज आपल्या राज्यात बेरोजगारांच्या समस्यांवर पर्याय शोधण्याचा प्रयत्न ज्या वेगाने होण्याची आवश्यकता आहे, त्या वेगाने होताना दिसत नाही. उलट बेरोजगारीमुळे होणारे कौटुंबिक वाद, आर्थिक ओढाताण आणि परिस्थितीचा रेटा यामुळे नैराश्येचे प्रमाण वाढीस लागून आत्महत्या वाढू लागल्या आहेत. याच सामाजिक स्पर्धेमुळे समाजाविषयी असलेली संवेदना संपुष्टात आलेली आहे.

अर्थात हा सगळा नकारात्मकतेचा सूर आळवला जात असताना या काळ्या बाजूला सकारात्मकतेची सोनेरी कडाही आहे, हे विसरून चालणार नाही. सगळा अंधार आहे म्हणत हातपाय गाळून बसण्याची आवश्यकता नाही. समाजातील अनेक क्षेत्रात अनेक जण सकारात्मकतेची कास धरून चांगल्या गोष्टी करत आहेत. डोंबिवली सारख्या मुंबईजवळच्या शहरात एका भाजी विक्रेतीचा मुलगा सीए होतो तर शेतीमध्ये नवनवीन संशोधने होत आहेत. शाळांमध्ये केवळ पगाराकडे लक्ष ठेवून दिवस भरणाऱ्या शिक्षकांकडून नकारात्मकतेचा सूर आळवला जात असतानाच नगर जिल्ह्यामधील वाबळेवाडीसारख्या ग्रामीण भागामध्ये दोन भिंतींची शाळा आंतरराष्ट्रीय दर्जाची करण्यासाठी धडपडणाऱ्या दत्तात्रय वारे गुरुजींचे कार्य त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील तळमळीची साक्ष देतेय. मराठी शाळा बंद पडत असताना मायबोलीतून शिक्षण घेतले तर मुलांना शिक्षणाची गोडी लागेल, त्यांना शिक्षण समजू शकेल, यासाठी धडपडणारी चिन्मयी सुमीत ही अभिनेत्री ही सकारात्मकतेची काही उदाहरणे आहेत. केवळ सरकारी नोकऱ्यांच्या मागे लागण्यापेक्षा शिक्षणाच्या आधारे खासगी नोकऱ्यांमध्ये चांगल्या पदांवर भरारी मारता येऊ शकते आणि दहावी-बारावीच्या परीक्षांमध्ये उज्वल यशही संपादित करता येते.

अलिकडेच प्रसार माध्यमांमध्ये स्पर्धा परीक्षांमध्ये बाजी मारणाऱ्या तरूणतरूणींच्या यशोगाथा वाचण्यास मिळाल्या. अशा सकारात्मक यशोगाथा वाचून त्यांचा आदर्श घेऊन आपले आणि आपल्या कुटुंबाचे उज्वल भवितव्य घडविण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करायला हवा. समाजमाध्यमांवरील आभासी विश्व मानत विसंवादी वृत्तीने समाजात वावरण्याऐवजी संवाद करत, एकमेकांना सहकार्य करत परिस्थिती बदलण्यासाठी आपल्यात बदल घडवला तर निश्चितच नकारात्मकतेचा काळा अंधार आपल्याला दूर करणे शक्य आहे. ज्यांनी असा अंधार दूर करण्याचा प्रयत्न केला त्यांना सकारात्मकतेची पहाट पाहण्याचा आनंद मिळाला. असा आनंद तुम्हा सर्वांना मिळो, या शुभेच्छा!

दीपावली
अभिष्टचिंतन

# सौ. वर्षा गणेश राव

**INSURANCE ADVISOR**
**9511858290**

सर्व प्रकारच्या INSURANCE कंपन्यांचे
INSURANCE एकाच छताखाली...

**HEALTH INSURANCE** **LIFE INSURANCE**

**BIKE INSURANCE** **CAR INSURANCE**

## वर्षा गणेश राव

९५११८५८२९०, ९७६४३९९९०५

## गणेश ऊर्फ राजू अशोक राव

१७७०, ए वॉर्ड, ताराबाई रोड, कोल्हापूर.
मोबा. ९७६४४६९९५६, ८२०८०५२४२५

# जीवनगाणे गात रहावे...

**डॉ. भाग्यश्री मुळे**
मोबा. ९८६०६०८१६६

**‘मिले सूर मेरा तुम्हारा’**
**‘देश हा देव असे माझा’**

असे समूहगान आपण करतो तेव्हा ‘अनेकता में एकता’ या शब्दांनी वर्णन केल्या जाणाऱ्या भारत देशाच्या एकतेची भावना आपल्या मनात जागृत होते.

‘ऐ मेरे वतन के लोगों’ हे गीत ऐकताना आमच्या शहीद जवान वीरांचे देशासाठी समर्पण आठवते. ‘भारतीय नागरिकाचा घास रोज अडतो ओठी, सैनिक हो तुमच्यासाठी’ ऐकून त्यांच्या देहत्यागाच्या कथा स्मरताना कृतज्ञतेची भावना मनात जागृत होते आणि सैनिकांसाठी आमच्या अंतःकरणात प्रार्थनेचे स्वरतरंग उठतात.

**‘नदिया चले चले रे धारा,**
**चंदा चले चले रे तारा, तुझको चलना होगा’**

**जन पळभर म्हणतील हाय हाय,**
**मी जाता राहिल कार्य काय’**

**‘या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे’**

किंवा

**‘एक धागा सुखाचा अन् शंभर धागे दुःखाचे’,**

**‘जिंदगी एक सफर है सुहाना,**
**यहाँ कल क्या हो किसने जाना’**

या सारखी गीते जीवनाचे मर्म सहजतेने समजावतात.

**‘ज्योत से ज्योत जगाते चलो,**
**प्रेम की गंगा बहाते चलो’**

**‘रंजल्या गांजल्या जिवा,**
**सांभाळीशी तू माधवा’**

गरीब, गरजू व्यक्तींना मदत करून समाजात प्रेमभावना पेरण्याचे संस्कार अशा गीतांमधील आशयाच्या माध्यमातून मिळतात.

‘जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे’ यांसारख्या गीतांतून ‘निराधार आधाराचा तोच भार वाहे’ तसा सर्वांचा पाठीराखा देव आहे, हे ऐकून दिलासा मिळतो.

**‘श्रीरामचंद्र कृपालू भज मन’,**

**‘गोविंद बोलो हरी गोपाल बोलो’,**

**‘रघुपती राघव राजाराम’,**

**‘रामकृष्ण हरी गोविंद’**

यांसारखी गीते नामस्मरणाचे पुण्य तर देतातच पण ‘नर’ ते ‘नारायण’ बनण्याचा, आत्मसाक्षात्काराचा मार्ग दाखवतात.

**‘आओ प्यारे साथ हमारे**
**जन–सेवा–हित सांझ सकारे’**

हे आमचे भारतीय आयुर्विमा महामंडळाचे ‘कॉर्पोरेट अँथम’ फक्त दोनच मिनिटांमध्ये आम्हाला संस्थेचे कर्तव्य आणि समाजबद्दलचे दायित्व सांगते.

**‘नीज माझ्या नंदलाला’**

**‘धीरे से आजा री अखियन में’,**

**‘आजा री आ, निंदिया तू आ’**

**‘निंबोणीच्या झाडामागे’**

या सारख्या अंगाई गीतांचे स्वर लहान बाळांना नीज येण्यासाठी गायले जातात, तसेच ते मोठ्यांची तन मन बुद्धी देखील शांतवण्याचं काम करतात.

लता, सुब्बलक्ष्मी, आशा, मन्नाडे, रफी, किशोर, मुकेश, हेमंतकुमार, भूपेन हजारिका, बालसुब्रमण्यम, शंकर महादेवन, हरिहरन आमच्यासाठी आता एक व्यक्ती न राहाता एक तत्व बनून आमच्या कणाकणात भिनले आहेत.

एक 'आवाज' इतका 'चिरंजीवी' असू शकतो?

होय, असू शकतो !

म्हणूनच तर 'गीतरामायण' आणि ते रचणारे गदिमा-बाबूजी अर्थात गजानन माडगूळकर आणि सुधीर फडके अजरामर होतात. 'बिनाका गीतमाला' चे सादरकर्ते अमीन सायानी जगप्रसिद्ध होऊन स्मरणात रहातात. लौकिकार्थाने त्यांचे निधन झाले तरी पुढील कित्येक पिढ्या त्यांचा आवाज ऐकत राहतील.

असे हे आवाज येतात कुठून? आपल्याशी त्याचं काय देणंघेणं? त्याचा शरीर-मन-बुद्धी-आत्मा याच्याशी काय संबंध? याचा विचार आपण करतो का? त्याचा आपल्या अस्तित्वाशी किती घनिष्ठ संबंध आहे हे आपल्याला माहित आहे का? सुमधुर स्वर आपलं जगणं प्रफुल्लित करतात आणि बेसूर भेसूर आवाज आपल्यावर विपरित परिणाम करतात हे आपण जाणतो का?

ध्वनी - नाद - स्वर - संगीत आणि गोंगाट - कलकलाट - धुमाकूळ - गदारोळ यातला फरक आपल्यावर सकारात्मक - नकारात्मक परिणाम करत राहतात, आपल्याही नकळत - हे आपल्याला जाणवतं का?

तर मग आवाज - ध्वनी - नाद - स्वर - संगीत ही गोष्ट गांभीर्याने घ्यायलाच हवी.

आवाजातलं माधुर्य, गोडवा आपलं जीवन समृद्ध करतो आणि गलका, कर्कश्य आवाज आपलं जिणं कुरूप करतो.

एखाद्या आजारी व्यक्तीची, अगदी आत्महत्येच्या टोकाला गेलेल्या एखाद्या व्यक्तीची निराशा पळवून लावून त्यांना जगण्याची उमेद देऊ शकतो एक सुरेल आवाज... तसंच एखादा चुकीचा आवाज अस्वस्थता, दहशत, बरबादीच्या खाईत आपल्याला लोटू शकतो. एखादा आवाज जीवघेणा असू शकतो तर एखादा जीवदान देणारा असू शकतो.

कधी मरणासन्न व्यक्तीला लता मंगेशकरच्या फोनवरून ऐकवलेल्या आवाजाने संजीवनी मिळते. तर कधी एखाद्या गाण्याची लकेर कानावर पडतांच त्या शब्दांनी सुरांनी मोहित होऊन, शब्दांचा आशय आणि त्यातला प्रबोधनात्मक अर्थ जाणवून आत्महत्या करू पाहणाऱ्या व्यक्तीचं मन पालटतं. तसंच घरातल्या - गल्लीतल्या भांडणाचे, अपघात, डॉल्बी, त्सुनामी, दंगेधोपे, वॉर, भूकंप, बॉंबस्फोट यांचे जे आवाज आपण ऐकलेले असतात, त्यांची नंतर आठवण जरी आली तरी पुढे कित्येक दिवस आपला थरकाप उडतो. 'आवाज' ही गोष्ट आपलं जगणं सुंदर करते तसेच ते असह्य करू शकते.

सनईच्या मंगल स्वरांनीच आपली मंगलकार्ये सजतात. पिकनिक पार्टी - गेट टुगेदर्सना गाण्याच्या भेंड्या, कॅराओके पाहिजेच. एक दिवस जरी रेडिओ, टीव्ही, मोबाईल, होम थिएटर वापरास बंदी घातली तरी तुम्हाला ती शिक्षा वाटेल. एखादा मुका माणूसच सांगू शकेल बोलून व्यक्त न होता येणं किती क्लेषदायक असतं ते...

एवढंच नव्हे, तर 'गर्जा महाराष्ट्र माझा' सारखे गीत एखाद्या राज्याची महती सांगते. 'वंदे मातरम'

दीपावली अभिष्टचिंतन

# किरण जोशी अॅण्ड असोसिएटस्

## रेन वॉटर हार्वेस्टिंग व फायर फायटिंग

## प्लंबिंग कन्सल्टंट

१७३१/१३, बी, मधुकिरण, न्यू महाद्वार रोड, कोल्हापूर ४१६ ०१२
फोन : (०२३१) २६२७०१५, मोबा. ९८९०००३८१०
E-mail : kiranjoshiassociates@gmail.com

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

एक नव्हे दोन नव्हे तर...
गेली ३५ वर्षे संगणक सेवेत

INSTACOMP

बिझनेस कोणताही असो

अकौंटस् तर टॅली होणं गरजेचंच

काळजी कशाला
इन्स्टाकॉम्प व टॅली आहे ना

टॅलीचे एकमेव पंचतारांकित पार्टनर...

TALLY
CERTIFIED
PARTNER
5 Star Sales & Implementation

साई प्रसाद, राजारामपुरी ५ वी गल्ली, कोल्हापूर - ४१६००८

9822027440 / 9850993300 / 9881074440
www.instacomp.com

आम्ही सर्वत्र आहोत.

‘जनगणमन अधिनायक जय हे’ हे संपूर्ण देशाचे मंगलगान असते.

तसेच प्रसारमाध्यमात देखील संगीत पाहिजेच. ‘हिंदुस्तां बोल रहा है’ सारखं गाणं ‘बी एस एन एल’ ची धून ठरते. रेडिओवर काही सेकंदच वाजलेली नुसती एखादी शीळ ‘एलआयसी’ ची ओळख दर्शवते तर टी व्ही वरील जाहिरातीत ‘झंडू बाम पीडाहारी बाम’ ऐकूनच निम्मी पाठदुखी बरी झाल्यासारखी वाटते.

सभासंमेलने, बैठका, उत्सव, सणवार, स्पोर्टस सगळ्याला संगीत पाहिजेच. अगदी भारताच्या स्वातंत्र्य दिनी ‘ऐ मेरे वतन के लोगों’ ऐकून नेहरूंचे डोळे पाणावतात. फुटबॉल आणि संगीत याचा अर्थाअर्थी काहीही संबंध नाही, तरीही फुटबॉलच्या वर्ल्डकप उद्घाटन सोहळ्याला सादर केलेले ‘शकीरा’ या प्रसिद्ध गायिकेचं ‘वाका वाका’ हे गाणे जगभरात ऐकले जाते. नुकतंच पॅरीस ऑलिंपिक मध्ये ‘लेडी गागा’ पासून इतरही महान कलाकार सीन नदी वर हजेरी लावून गेले आणि आपल्याला लाईव्ह टेलिकास्ट वर

**‘लहरा दो, लहरा दो,**
**सरकशी का परचम लहरा दो**
**गर्दिश में फिर अपनी**
**सरज़मीं का परचम लहरा दो...’**

ऐकताना स्फूर्ती मिळाली.

या सगळ्यासाठी संगीतच का? असा प्रश्न आपल्या मनात येणं साहजिक आहे.

स्व-अभिव्यक्तीच्या आणि भावना प्रकटीकरणाच्या बाबतीत संगीत खूप उपयुक्त ठरले आहे. संगीतात अनन्यसाधारण शक्ती आहे. फक्त गायनाद्वारे, ड्रम किंवा बासरी किंवा गिटार सारखे वाद्य वाजवून, तुम्ही मनातलं नेमकेपणाने प्रकट करू शकता. उदा. ‘कॉल ऑफ द व्हॅली’ हा अल्बम. शब्दप्रधान संगीताच्या मदतीने अगदी तीव्र भावना देखील व्यक्त करू शकता. उदा. ‘दहा दिशांनी दहा मुखांनी आज फोडिला टाहो’ किंवा ‘त्या कोवळ्या फुलांचा बाजार पाहिला मी’ अथवा ‘तडप तडप के इस दिल से आह निकलती रहीं’ ही गाणी ऐकताना आपले हृदयही पिळवटून निघते.

स्वत:ला व्यक्त करण्याचे एक प्रभावी माध्यम म्हणून आवाज, संगीत याचा उपयोग होऊ शकतो. प्राचीन काळापासून मानवाच्या अभिव्यक्तीच्या गरजेतूनच तर संगीत, नृत्य इ. १४ विद्या आणि ६४ कलांचा जन्म झाला.

संगीत हे वैश्विक आहे. भाषा जाती धर्म देश वेश सीमा यांच्या पलिकडे आहे. म्हणूनच 'नम्मम्मानि सौभाग्यदा लक्ष्मी बारम्मा' ही देवी मातेची आळवणी आहे हे भाषा न जाणतां सुद्धा आपल्याला समजते. 'व्यंकटेश स्तोत्र' 'कॉयर साँग्ज' जगभरातील लोक गाऊ शकतात.

संगीताचा आनंद घेण्यासाठी तुम्ही संगीतकार किंवा लेखक असण्याची गरज नाही. स्वतःच्या खऱ्या अभिव्यक्तीसाठी शब्द - सूर - संगीत तुमची मदत करतील. स्वतःला मुक्त करण्याचा आणि इतरही गोष्टींना वेगळ्या, निकोप दृष्टीकोनातून पाहण्याचा हा एक मार्ग आहे. तुमची भावनाभिव्यक्ती करणारी रचना एकदा संगीताच्या माध्यमातून तुम्ही व्यक्त केलीत की तुम्हाला मुक्त वाटते.

कारण स्व-अभिव्यक्ती महत्त्वाची असते. स्वत:ला व्यक्त करणे अनेकांसाठी कठीण असू शकते परंतु ते अत्यंत आवश्यक आहे. संगीत हे त्यासाठी निश्चितच एक चांगले माध्यम आहे. संगीत हे समाजप्रबोधनाचे देखील चांगले माध्यम आहे. संगीतोपचार व्याधी दूर करण्यासाठी उपयुक्त आहेच,

शिवाय मानसिक भावनिक समस्यांसाठी देखिल प्रभावी ठरतात.

योगातील काही प्रक्रियांना देखील संगीत पूरक ठरते. समांतर अशा क्रियांतून दोन्हीची सांगड घातली तर उत्कृष्ट रिझल्ट्स मिळू शकतात.

अष्टांग योगातील पहिल्या दोन पायऱ्या म्हणजे यम नियम – म्हणजे रोजचे चलनवलन – त्यासाठी संगीत आपल्या सोबत असतेच. आसन हा झाला शरीर स्वास्थ्याचा व्यायाम. मात्र गाणे गाताना आपण पुरेसा श्वास घेतो. गाताना कधी श्वास रोखतो, श्वास पुरवून पुरवून रचना सादर करताना नियमन करून वापरत सोडतो, ही क्रिया प्राणायामासारखीच आहे. यातून नकळत दीर्घ श्वसन, जलद श्वसन, अनुलोम विलोम, पूरक – कुंभक – रेचक केला जातो म्हणजेच प्राणायाम घडतो.

अंतरंग योगामध्ये प्रत्याहार – शरीराकडून मनाकडे जाण्यासाठी सदाबहार गीते ऐकणे किंवा संगीत – वाद्य – नृत्य यांचा रियाज पूरक ठरतो. त्यामुळे आपण एक्स्ट्रोव्हर्ट न होता इंट्रोव्हर्ट होऊ शकतो.

धारणा – ध्यान करण्यासाठी स्वरांचे, गीताच्या आशयाचे चिंतन मनन करावे. याला 'म्युझिकल मेडिटेशन' म्हणता येईल.

सुरेल संगीत ऐकताना तंद्री लागून काही काळ समाधी अवस्थेची अनुभूती मिळतेच, तिचाही लाभ घ्यायला हवा.

अर्थात, यासाठी संगीत हे मनोरंजनाच्या पातळीवरच न ठेवता त्यांतून आणखी अनेक लाभ मिळवणे शिकायला हवे.

ताणतणावांनी भरलेल्या रोजच्या आयुष्यात स्वस्थता देणारे, मनावर सुंदर स्वरलहरी शिंपडून अंगावर रोमांच उभे करणारे, मेंदूला हलकासा मसाज करणारे असे हे संगीत आवडत नाही असे पृथ्वीतलावर कुणी नसेल. मनुष्याबरोबरच प्राणीपक्षी, वनस्पती देखील संगीतामुळे अधिक सक्षम होतात यावर अनेक स्तरांवर संशोधन होतच आहे, चालू आहे, होत राहील. हां, पण यासाठी संगीत हे मधुर असले पाहिजे. त्यासाठी आपण काही पथ्ये पाळणे आवश्यक आहे.

कोकिळा हवी – कावळा नको

गणपती, दुर्गामातेची आरती हवी – विसर्जनात डॉल्बीचा दणदणाट नको.

सुसंवाद हवा – भांडण नको

ट्रॅफिक असला तरी गोंगाट नको

गर्दी असेना, पण हॉर्नचा कलकलाट नको

अस्थिरता असेल, युद्ध नको, शांती हवी

याचा पुरस्कार करायला हवा. यासाठी कटिबद्ध व्हायला हवे.

'जीवन संगीत'या ध्वनिप्रदूषण विरोधी चळवळीत सहभागी होऊन तिची व्याप्ती वाढायला हवी.

'सूर निरागस हो, विश्व निरामय हो' ही तुमची टॅगलाईन असायला हवी.

यासाठी आपल्या अंतर्मनातील 'आपला आतला आवाज' ओळखण्याची गरज आहे. संगीत हे स्वस्तः आणि मस्त, सहज उपलब्ध असणारे उपकरण, टूल आहे ते अचूक वापरायला हवे आणि स्वतःची उन्नती साधायला हवी. एकदिलाने गावे ... कारण

**'नाम गुम जायेगा, चेहरा ये बदल जायेगा**
**मेरी आवाजही पहचान है, गर याद रहे।'**

# बफर टाईम

•

**प्राजक्ता पटवर्धन**
मोबा. ९७३०७३०१४६, ७०२०३०२५५९

कधी कधी काही गोष्टी अनपेक्षितपणे समोर येतात आणि नशिबाने आपल्यावर केवढी मेहेरबानी केली आहे असं वाटून जातं. कुठल्याही गोष्टीची वेळ तशी ठरलेलीच असते. म्हणजे आपल्या नशिबाने ती ठरवलेलीच असते. केव्हा काय कशाप्रकारे घडेल हे बऱ्याचदा आपण ठरवत असतो पण त्यातही अनेकदा ठरवलेल्या गोष्टी ठरवलेल्या वेळेला ठरवलेल्या पद्धतीने घडतीलच याची शाश्वती आपण देऊच शकत नाही. आणि जो ही शाश्वती देऊ शकतो त्याला माझे कोपरापासून दंडवत !

पाहुणे येणार असतात. जेवायला येणार असतील तर त्याप्रमाणे किंवा नाश्ता करायला येणार असतील तर त्याप्रमाणे आपण पाहुणे यायच्या साधारण अर्धातास आधी सगळी तयारी करून ठेवतो आणि ठरलेल्या वेळेला पाहुणे येत नाहीत. मग फोन येतो ट्रफिकमध्ये अडकले आहेत. आणि मग ते नाश्त्याऐवजी एकदम जेवायलाच येतात. त्यावेळी ठरवलेल्या मेन्युसोबत भर म्हणून काहीतरी आणखी बनवायला लागतं. किंवा आता हे पाहुणे ट्रॅफिकमध्ये अडकले आहेत आणि यायला किमान तासभर तरी लागेल. या विचारांनी आपण ऑन द स्पॉट मेन्यू बदलतो. हा एक तासाचा बफर टाईम मिळतो त्यात आपण बरंच काही करतो. तेव्हा वाटतं.. हा बफर टाईम होता ते बरं झालं.

परीक्षेची तारीख ठरलेली असते. आपण तयारीही करतो आणि अगदी दोन दिवस आधी समजते की परीक्षेची तारीख काही कारणाने एक दिवस पुढे ढकलली आहे. आणि तेव्हा मिळालेला हा बफर टाईम म्हणजे आशीर्वादच वाटतो.

माणसाचं मन कसं असतं ना, एखादी गोष्ट पुढे येऊन ठेपली की तिची तीव्रता खूप जाणवू लागते आणि असा एखादा बफर टाईम मिळाला की एखादा हिरा गवसल्यासारखे वाटते. क्वचित हा बफर टाईम नकोसा सुद्धा होतो. पण बऱ्याचदा मिळालेला हा वेळ हवाच असतो.

हे सगळे आज सांगायला कारण म्हणजे १० मे २०२४ ला अमेरिकेहून सुट्टीसाठी आलेला माझा लेक ३ जूनला परतायचा होता. तो इथे होता तेव्हा आता दोन महिने पिलू सोबत आहे.. खूप छान वेळ घालवू असे ठरवले होते. त्याप्रमाणे आम्ही १६ मे ते ३० मे पंधरा दिवस अगदी छान कोल्हापूर, सांगली कोकण अशी छान ट्रीप करून आलो. दोन्ही आजी आजोबांनी अगदी त्याचे खूप लाड केले. परतल्यावर जरी १ जूनपासून माझी शाळा सुरू झाली तरी त्याच्यासाठी वेळ देणे चालूच होते. त्याला हवे ते पदार्थ करणे, पुण्यात तो म्हणेल तिथे जाणे.. नेटफ्लिक्स, किंवा प्राईमवर वेगवेगळे मूव्हीज पाहणे. तो आता जाणार म्हणून त्याच्यासोबत एकत्र गप्पा मारत झोपणे .. जवळजवळ संपूर्ण जून महिना हाच प्रोग्रॅम होता. हळू हळू त्याच्या जाण्याची तारीख जवळ येत होती. ३ जुलै!

२ जुलैला दुपारी चार वाजता निघायचे. त्याची फ्लाइट मध्यरात्री १.३० वाजता होती. त्यामुळे ८ पर्यंत पोचून थोडावेळ त्याच्यासोबत तिथे घालवून मग रात्री १० वाजता लेक चेक इन साठी गेला की आपण परत यायचे असा प्लॅन ठरला.

बघता बघता दोन महिने कधी कसे निघून गेले समजलंच नाही. मन खूप वेडं असतं. जितकं प्रेम, जितका जिव्हाळा मिळतो तितका हवाच असतो. आपल्या जिवाभावाच्या माणसांची सोबत सतत हवीच असते. ३० जून उलटला आणि खऱ्या अर्थाने आता दोन दिवसांनी हे घर खायला उठेल. मी शाळेतून घरी येईन त्यावेळी माझा लेक घरी नसेल. 'आई उद्या सकाळी पनीर मसाला करून जा' अशी फर्माईश करायला कुणी नसेल. आई, दाल माखनी कर असे कोण सांगेल. 'आई चल ड्राईव्हला जाऊया' असे कोण म्हणेल? नुसता विचारांचा दंगा चालू होता. घरात मनातली खळबळ दाखवू शकत नव्हते. त्यामुळे क्वचित कधी शाळेत मैत्रिणींसोबत शेअर करत होते. १ तारखेची रात्र येऊच नये, इथेच थांबून रहावी असे वाटत होते.

पण तो काळ आहे. तो कुणाहीसाठी थांबत थोडीच असतो? तो त्याचं काम नित्यनेमाने करणारच! १ जुलैची रात्र अत्यंत अवघड होती. उद्या माझा लेक यावेळी फ्लाईटमध्ये असेल, माझ्या कुशीत नसेल. हा विचार मनाला घरं पाडत होता. थोपवायचा प्रयत्न करूनही अश्रू बाहेर येतच होते. ही फक्त माझीच नाही तर लेकाचीही स्थिती होती. आम्ही एकमेकाला घट्ट बिलगून झोपलो होतो. तो स्पर्श मी साठवून ठेवत होते. उद्या माझी मिठी रिकामी असणार, माझा पिलू त्यात नसणार ! इतके दिवस त्याच्या जाण्याची तारीख माहिती असूनही ही अवस्था होती.

आणि २ जुलै उजाडलाच. मी सुट्टी घेतली होतीच. सकाळपासून अस्वस्थता कधी लपवत, कधी दाखवत घरात आम्ही वावरत होतो. त्याच्या आवडीचा स्वयंपाक आजही अर्थातच होता. दोन वाजता आम्ही ठरवलेली कॅब आणि ड्राईव्हर आम्हाला असाईन झाल्याचे कंपनीकडून समजले. जेवणे चालू होती. त्याला 'तिथे गेल्यावर काळजी घे, रोज सकाळ संध्याकाळ फोन कर, वेळच्यावेळी जेव.' वगैरे टिपिकल आईटाईप सूचना चालू होत्याच. आणि त्याचा फोन बीप झाला. त्याने पाहिले आणि एकदम... 'ओह, शिट्!' असे म्हणत उठला.

त्याचे फ्लाईट I 191 कॅन्सल झाल्याची इमेल होती आणि रिश्येड्युल करण्यासाठी लिंक दिली होती किंवा त्यांच्या हेल्प लाईनला कॉल करायचा होता. आम्ही कॉल केला आणि त्याची फ्लाईट रिशेड्युल केली. उजाडता ५ जुलै मध्यरात्री १.३० वाजता.. ! दिड दिवस अख्खा मिळाला !

लेकाने लगेच जाहिर केले. मिळाला आहे वेळ तर चला कुठेतरी भटकायला जाऊ. पुढच्या ५ मिनिटांत प्लॅन बनला आणि आम्ही खडकवासला धरण पहायला गेलो.

तिथे झिरमिर पडणाऱ्या पावसात भजी, चहा, थोडा फेरफटका. तिथे छान छान फोटो काढून चांगले २-३ तास तिथे घालवून आम्ही परतलो !

३ जुलैचा दिवस सुद्धा बोनस मिळाला होता. त्यादिवशीही नेटफ्लिक्सवर छान मूव्ही पाहिली.

४ तारखेला निघायचे होते दुपारी ४ वाजता. पण जशी १ जुलैला रात्री मनात खळबळ होती. तशी खळबळ ३ जुलैच्या रात्री नव्हती. उद्या दुपारी निघायचं आहे हे माहिती असूनही मन शांत होतं. आम्ही सगळेच नेहमीसारखे दंगा करत झोपी गेलो.

दुसरे दिवशीही मी शाळेत गेले. अगदी शांत मनाने. आणि हाफ डे घेऊन आले. मग पुन्हा लेकाची थोडीफार तयारी आणि पुढच्या २ तासांत बाहेर पडायचे. कॅब अगदी वेळेत आली. लेक सगळ्या घरात हिंडून आला. पुन्हा एकदा त्याला घट्ट मिठीत घेतलं. हातावर प्रेमाने दहीसाखर ठेवली. देवाला

नमस्कार करून बरोब्बर ४ वाजता निघालो मुंबईला. पूर्ण प्रवासात हात घट्ट धरून बसलो होतो. तरीही मन शांत होतं.

तिथे २ तास सगळ्यांनी एकत्र एअर पोर्टवर खूप छान वेळ घालवला. जेवणे उरकली आणि बरोब्बर १०.३० वाजता लेक चेकइन करण्यासाठी निघाला आणि नकळत बांध फुटला. तो कितीही रडणे टाळत असला तरी त्याची आई आहे मी.. त्याच्या डोळ्यात तरळलेलं पाणी मला दिसलंच!

रस्ता ओलांडून तो गेटच्या दिशेने गेला आणि नजर धूसर कधी झाली. समजलेच नाही. तो आत जाणाऱ्या रांगेत उभा होता आणि नकळत त्यानेही डोळे पुसल्याचे मी पाहिले. तसंच धावत जाऊन त्याला मिठीत घ्यावे वाटत होते.. पण तोपर्यंत तो सिक्युरिटीपर्यंत पोहोचला आणि पासपोर्ट दाखवून आत जाण्याआधी एकदा मागे वळून पहायला विसरलं नाही माझं पिलू! आणि मग आम्हीही आमच्या कॅबकडे निघालो पुण्याला परतण्यासाठी.

हे सगळं असं चित्रपटासारखं आजही डोळ्यापुढे आहे. लेक येत राहील पुन्हा पुन्हा परदेशी जात राहील. कदाचित बाकी सर्व चित्र असंच असेल, पण या बफर टाईममुळे हे जे काही हाती लागलं.. ते कायमचं स्मरणात राहील हे नक्की.

परतत असताना सुद्धा मन शांत होतं हे नक्की. या बफर टाईममुळे मनाची तयारी झाली म्हणायचे की आणखी काही? लेक आला तेव्हाच त्याची परतण्याची तारीख ठरलेली होती.. त्यामुळे मनाची तयारी तर तेव्हापासूनच व्हायला हवी होती ना? पण तसं का नाही झालं? की त्या एका दिवसात जो वेळ लेकासोबत मिळाला तो खरंच नेमके काय देऊन गेला जे पूर्ण दोन महिन्यात मिळाले नाही.. ? याचं उत्तर शोधायचा प्रयत्न केला तर अजूनतरी मिळाले नाही. आणि आता मी शोधतही नाहीये.

पण हा बफर टाईम किंवा बोनस टाईम म्हणू... सर्वांनाच मिळायला हवा असं वाटून गेलं. प्रत्येक त्या त्या वेळी जेव्हा जेव्हा मनामध्ये प्रचंड उलथापालथ होत असेल.. अस्वस्थ वाटत असेल किंवा खळबळ माजली असेल. असा बफर टाईम मिळायला हवा.

सहजच मनात आलं... माझ्या शेवटच्या क्षणी सुद्धा अगदी अख्खा दिवस नाही मिळाला तरी २ तास तरी मिळावेत बफर टाईम म्हणून.. सगळ्यांचा निरोप घेऊन शांत मनाने डोळे मिटावेत !


**With Best Compliments**

SHIVAM

**Mr. Rajesh S. Dixit (Director)**

## Shivam Texmech Pvt. Ltd.

(a Shivam group company)

1652, 'E', Yashwant Sankul, 7th Lane Rajarampuri, Kolhapur - 416 008 (MAH) India.
Tel. +91 - 231-2527898 www.shivam.in

# लांडगा आला रे...

**सौ. मनिषा अभय गद्रे**
मोबा. ९४०३६०४८८१

''अहो जरा उठता का? मी काय म्हणते ऐका. उठताय नं? उठा लौकर !'' ती सिंहीण केव्हाची सिंहाला उठवत होती. पण हा ढिम्म, अजिबात उठायला तयार नव्हता. हरणावर यथेच्छ ताव मारून सुस्तावलेला, अजून झोपायचं होतं. डोळे उघडायला तयार नव्हते. पण सिंहीण काही झोपू देईना. तिची झोप पार उडाली होती. जंगलातलं गार वारं लपेटत पिवळ्या गवतावर विसावलेल्या सिंहाने डोळे किलकिले करून तिच्याकडे बघितलं. तेवढाच क्षण टिपून तिने परत सुरुवात केली, ''मी एवढं सांगून सुद्धा तुम्हाला उठावसं वाटत नाही? इथे माझी झोप उडालीय आणि तुम्ही कसे हो निवांत झोपता?''

''अगं पण एवढं झालं तरी काय? एवढं मस्त जेवण झाल्यावर न झोपणे म्हणजे जेवणावरचा हा अन्याय आहे. झोप तू शांतपणे.''

''म्हणे झोप शांतपणे. मगाशी तो लांडगा येऊन गेल्यापासून चैन नाही जीवाला. मला त्याचं बोलणं काही पटलं नाही. तो स्वतःला फार शहाणा समजतोय.''

''तो काय म्हणतो ते सगळं नीट ऐकून घेऊया. मग काय ते बघू. कृपा करून आत्ता मला झोपू दे.''

''असं कसं? तो कोण ठरवणार हो? म्हणे सगळ्या प्राण्यांची मीटिंग बोलवा. हा तुम्हाला ऑर्डर सोडणार? तुम्ही पण बरे ऐकून घेता त्याचं? माझं कधी ऐकलं का आजपर्यंत?''

''बाई गं तुझ्या शब्दाबाहेर जायची माझी हिम्मत तरी होईल का? त्यालाही त्याचं मत मांडायचा अधिकार आहे नं? तो काय सांगतो ते ऐकूया. मीटिंग संध्याकाळी आहे ना, मग झोपू दे मला. झोप पूर्ण नाही झाली तर मला ॲसिडिटी होते. गप्प बस आता.'' सिंहानं तिचं बोलणं धुडकावून लावून तो मान फिरवून निद्रिस्त झाला.

तिला काही चैन पडेना. ती फेऱ्या मारत विचार करत होती. सकाळी सकाळी हा लांडगा दत्त म्हणून हजर. रात्रभर मेहनतीने तिने हरणाची शिकार करून आणली. त्या तरुण हरणाने तिला खूप पळवलं होतं. दमून भागून शिकार घेऊन गुहेत आली. तिचे गोंडस बछडे आणि ह्या दोघांचं यथेच्छ पोटभर झाल्यावर उरलेली हाडं हा लांडगा चघळत उभा होता. आयतं फुकटचं खाल्लयावर याची हिम्मत आणखी वाढली; आणि आला की लाळघोटेपणा करत त्यांच्याशी बोलायला.

''तुम्ही जंगलचे राजे, शूरवीर, पराक्रमी म्हणून देवाने हे पद फक्त तुम्हालाच बहाल केलं. तुमची थोरवी वर्णावी तितकी थोडीच आहे. तुमच्या पराक्रमांच्या कथा ऐकतच आम्ही मोठे झालो. शिकारीचे धडे आम्ही तुमच्यापासून गिरवतो, पण महाराज एक गोष्ट तुमच्या ध्यानात आणून द्यायचीय. तुमची आज्ञा असेल तर संध्याकाळी तुमचा दरबार भरवून मी ती सगळ्यांनाच सांगेन म्हणतोय.''

''हं !! म्हणे शिकारीचे धडे गिरवतो. फुकटचं गिळतो ते काय असतं? कधी शिकार केली ह्याने? लचकेच तोडत असतो; आणि आमच्या ह्यांना पण ना, जरा कोणी स्तुती केली की पाघळलेच. लगेच मान डोलावून संमती दिली पण. माझाच जीव राहवला नाही म्हणून विचारलं,

''पण एवढं काय महत्त्वाचं आहे? आभाळ कोसळले काय तुझ्यावर?''

''अहो महाराणीसाहेबा, आभाळ कोसळण्यापेक्षा पण हे खूप मोठं आहे. एक सिक्रेट सांगायचंय.''

''कसलं सिक्रेट? कोणाचं सिक्रेट?''

''मी माणसांबद्दल सांगणार आहे.''

''तुला रे कसं कळलं पण?''

''काय सांगू आता? अहो महाराजांच्या हद्दीत ती माणसं घुसलीत राणीसाहेब. सावध रहायला हवं आपल्याला. म्हणूनच सगळ्या प्राण्यांना समजावं यासाठी मीटिंग बोलवूया आपण, म्हणजे ते सिक्रेट सगळ्यांना समजेल.''

हा लांडगा स्वतःला फार हुशार आणि शहाणा समजतोय. आमचे हे पडले भोळे, जरा स्तुती केल्यावर खुश झालेत. मला आज काय ते बघायला हवं. त्याला ह्यांचं आसन बळकवायचं असणार. स्वतःला राजा म्हणून मिरवायचं असणार. त्याचा यामागे निश्चितच काहीतरी डाव असेल. नाहीतरी ही जात धूर्त आणि लबाडच असते, हे तर सर्वश्रुत आहे.

आज संध्याकाळच्या मीटिंगची बातमी वाऱ्यासारखी पसरली. हळूहळू करत एक-एक प्राणी गुहेजवळ जमायला सुरुवात झाली. आपोआपच त्यांच्यात दोन गट पडले. ससे, हरण, नीलगाई, बैल, शेळ्या, हत्ती, गवा, जिराफ इत्यादी शाकाहारी मंडळी एका बाजूला जमली. सगळ्या बछड्यांना मात्र मज्जा येत होती.

''आपल्याला सगळ्यांना एकत्र कशासाठी बोलवलंय?'' छोट्या सशाला मोठा प्रश्न पडला.

''बहुतेक आपल्याला चरण्यासाठी भरपूर हिरवगार गवताचं कुरण सापडलं असणार.'' एका मेंढ्याचं भोळसट उत्तर.

''मला तर खूप आवडेल मोकाट चरायला.'' गवा उत्तरला.

''तिथे पाणी आणि चिखल असला म्हणजे झालं.'' हत्तीने प्रतिक्रिया दिली.

''कित्ती मजा येईल ना तिकडे पकडापकडी खेळायला, लपाछपी खेळायला?'' हरणाचं गोंडस पिल्लू कल्पनेनंच खुश झालं.

''पण खरंच तसं असेल का? नाहीतर उगाच आपण आपले खुश व्हायचे.'' जिराफ म्हणाला.

''कारण मला दूर दूरपर्यंत तरी तसं गवत वगैरे काही दिसत नाहीये.''

''हो, खरंय.'' माकडाने री ओढली.

''काय माहित मग कशासाठी बोलावले?'' साळींदरने पिसारा मिरवत म्हटलं, ''पण चांगलीच बातमी असणार!''

इकडे दुसऱ्या बाजूला सगळे मांसाहारी प्राणी जमू लागले. त्यांचं निम्मं लक्ष शाकाहारी ग्रुपकडे होतं. पण जंगलाचा प्रोटोकॉल होता, मिटींगला हिंसा नाही.

''कशाला बोलवलं असेल आपल्याला?'' जंगली कुत्र्याने प्रश्न उभा केला.

''मला वाटते कुणीतरी दुसऱ्या जंगलातला प्राणी आला असेल आपल्या हद्दीत.'' कोल्हा उतरला.

''पण कोणाला तरी दिसला असता. मला नाही तसं वाटत.'' तरसाने प्रतिक्रिया दिली.

''अरे येऊ देत की समोर, असा उभा आडवा फाडीन त्याला!'' बिबट्या चित्कारला.

''आपल्या जंगलात कोणीही असा ऐरा-गैरा येऊच शकत नाही.'' वाघ बोलला.

''पण मीटिंग बोलवलीय कुणी?''

''मला लांडग्याकडून निरोप मिळाला. ए तुझा जातवाला ना तो? कशासाठी बोलवलंय.'' वाघाने दुसऱ्या लांडग्याला विचारले.

''मला नाही माहित. तो एकटाच जातो कुठे कुठे कळप सोडून. आम्हाला काही सांगत नाही.''

''ऑ ! असं कसं? सांगत नाही म्हणजे?'' वाघ.

''असू दे ! असू दे !! बघूया काय म्हणतो ते.'' अस्वलाने मध्यस्थी केली.

गुहेबाहेर आख्खं जंगल लोटलं. सगळेजण सिंहाच्या प्रतीक्षेत होते. सगळ्यांची उत्सुकता शिगेला पोहोचली. एकदाचा तो क्षण आला. सिंह शेपटी उंच ताठ करून बाहेर आला. पाठोपाठ डुलत डुलत सिंहिण आली. बछडे उड्या मारत सैरावैरा पळाले. सगळे प्राणी उठून उभे राहिले. सिंहाने मानेनेच त्यांना अभिवादन करून बसायला सांगितले. आता प्रश्नार्थक नजरा सिंहावर स्थिर झाल्या. तो बोलायला उभा राहिल्यावर जंगलात चिडीचूप शांतता पसरली. फक्त वाऱ्यासोबत पानांची सळसळ होती.

''माझ्या तमाम जंगलवासियांनो, आज आपणास तातडीने बोलावलं, कारण तुमच्यातल्याच एका सदस्याला काही गोष्टी सांगायच्यात, तर...''

''आता आम्ही काय इथे गोष्टी ऐकत बसायचं?''

''हा कोण लागून गेला गोष्टी सांगणारा?''

''आला की मोठा शहाणा...''

''कुठेय रे तो? बघतोच...'

सगळे प्राणी एकच दंगा करू लागले. सिंहाने गर्जना केली. सिंहिणीने तोंड वाकडं केलं. ''आधी त्याचं म्हणणं ऐकून घ्या शांतपणे. इथे सगळ्यांना बोलायची मुभा आहे, फक्त त्याचं पूर्ण झाल्यावर.''

सिंह खाली बसल्यावर लांडगा पुढे झाला... ''माझ्या मित्रांनो, तुम्ही आधी माझं शांतपणे ऐकून घ्या. मग काय ते बोला. या समृद्ध जंगलात आपण किती आनंदाने राहतो, हे सगळ्यांनाच माहित आहे. आजपर्यंत हे जंगलच आपणा सगळ्यांचे पोट भरतय आणि रक्षण पण करतय. पण गेले काही दिवस मानव आपल्या जंगलावर आक्रमण करतोय, वृक्षतोड करतोय. त्यामुळे आपणा सर्वांची वानवा होतेय. जंगलातून प्राणी बेघर व्हायला लागलेत. जंगल सोडून चुकून शहरात जात आहेत.''

''अरे नवीन काहीतरी सांग रे, हे माहितीय आम्हाला.''

''हो. नवीनच गोष्ट सांगणार आहे त्या माणसांबद्दल. त्याच मुद्द्यावर येत आहे. तर आता आपल्या जंगलात पण मानवांचा शिरकाव झालाय. गेले काही दिवस मी त्यांच्या मागावर होतो. त्यांचं निरीक्षण करत होतो आणि अशी एक गोष्ट माझ्या निदर्शनास आली की, आपण मानवाला अतिशय बुद्धिमान आणि शक्तिमान प्राणी समजत होतो, तर तसं काही नाहीये. तो अतिशय भित्रा प्राणी आहे. अगदी सशापेक्षाही भित्रा...!''

सगळेजण सशाकडे बघू लागले. त्याने कान ताठ केले आणि नजर चुकवत अंग चोरले. सिंह छाती फुलवून सगळ्यांकडे बघत होता, तर सिंहीण संशयाने लांडग्याचे भाष्य ऐकत होती.

''तुला कसं समजलं? त्या माणसांनी सांगितलं?'' इति गाढव. तसा हा प्रश्न सगळ्यांनाच पडला होता.

''मगाशीच सांगितलं ना की, मी त्यांच्या मागावर होतो. मी त्यांचं निरीक्षण केलं. मध्ये एकदा माझ्या लक्षात आलं, मध्यंतरी काही दिवसांपूर्वी मला वेगवेगळे आवाज ऐकायला येत होते, म्हणून मी आवाजाच्या दिशेने गेलो. अचानक समोर माणसं

दिसली. त्यांच्या हातात वेगवेगळी हत्यारं होती. जंगल तोडण्यासाठी ते आले होते. अचानक मी समोर दिसल्यावर त्यांच्यात एकच घबराट उडाली. माझ्याकडे बोट दाखवत ते एकदम पळू लागले, वाट फुटेल तिथे. आधी मीच खरं तर घाबरलो होतो, मला कुठे पळावं ते समजत नव्हतं, रस्ता सापडत नव्हता. मी एकटा आणि ते बरेच लोक होते. तरी पळता भुई त्यांचीच झाली. मी परतीच्या रस्त्याच्या शोधात पळत होतो, तर ते मला अचानक बघून पळत होते. अशी पळापळ झाली, पण ते माझ्याकडे बोट दाखवून पळत होते. मला काहीच कळेना. दुसऱ्या दिवशी मी थोडी हिंमत करून परत तिथेच गेलो, तीच पुनरावृत्ती झाली. तिसऱ्या दिवशी पण तेच. मग माझ्या लक्षात आले ते माझ्या दातांकडे बघून घाबरायचे. माझ्या उघड्या जबड्याला घाबरायचे. मला मजा येऊ लागली. या चिरकुट माणसाला उगाच आपण श्रेष्ठ समजायचो. असं बरेच दिवस चालल्यानंतर त्यांनी एक मोठा पिंजरा आणला, पण मी अडकलो नाही. कारण परतीचा रस्ता बघून ठेवला होता. हळूहळू मी मागे मागे त्यांच्या गावापर्यंत जाऊन आलो. तिथे तर मला फारच वेगळे, विचित्र प्रकार बघायला मिळाले !''

इकडे सिंहीण व्यथित झाली. सिंहाच्या कानात कुजबुजली, ''अहो, त्याचा शहाणपणा ऐकताय ना? कसल्या थापा मारतोय. तुम्ही शांतपणे ऐकून घेताय? म्हणे माणूस याला बघून घाबरला ! राजाच जणू हा जंगलाचा !! पुढचा धोका ओळखा. त्याला तुमचं स्थान पटकावयाचं आहे; म्हणून एवढ्या फुशारक्या मारतोय. अहो, त्याची लांडग्याची जात. शेवटी तो मुळावरच जाणार... लचकेच तोडणार... तुम्ही का ऐकून घेताय? त्याच्या थापा ऐकून माझं डोकं फिरायला लागलंय. आपल्या मुलांवर त्याचे वाईट संस्कार होतील !''

''ए, तुझी बडबड बंद कर जरा. सगळेजण ऐकत आहेत आणि तुला एकटीलाच कसला प्रॉब्लेम आहे गं? त्याचं सगळं सांगून होऊ दे ना, तोपर्यंत दम नाही निघत का?''

लांडग्याचं लक्ष सिंहिणीच्या चुळबुळीकडे होतं. तिची अस्वस्थता त्याला कळत होती, पण सिंहाच्या बोलण्यामुळे त्याला थोडा धीर आला.

''राणीसाहेब, आता पुढचं ऐका. मी जेव्हा माणसांच्या गावात गेलो, तेव्हा तिथे मला बघून बायका-मुलं पळू लागली, दारं बंद करून घेऊ लागली. माणसं जीवाचं रान करून पळत होती. एक कोंबडी अचानक घाबरून माझ्या पायात आली. मला आयतीच शिकार मिळाली. दोन-तीन कोंबड्यांची मेजवानी करून मी परत आलो. येताना वाटेत त्या माणसांनी बांधून ठेवलेला हत्ती भेटला. मला म्हणाला, 'तू कसा काय मोकळे हिंडतोस? जा पळ जंगलात. इथे कशाला येतोस? मला बघ कसं जखडून ठेवलंय. राब राब राबवतात, पोटभर खायला पण देत नाहीत. परत माझे दात पण उपटतात. इतकं दुखतं ना, पण सांगणार कुणाला? त्यांना काय उपयोग होतो काय माहित? तू जा बाबा जंगलात, खूप सुखी आहेस तिथे.' मी त्याला म्हटलं, 'अरे माणसाने तुला बांधून ठेवले, पण तू कसा बांधला गेलास? दे जोरात हिसका आणि हो मोकळा. तू नुसता त्याच्यामागे पळत जा, बघ कसा तोच उलट्या पावलाने पळत जाईल. तुझ्यातली ताकद ओळख, तुझ्यासाठी वापर कर. माणसाच्या उपयोगी का पडतोस? तुझ्या जीवावर तो पोट भरतो आणि तुझं नाही, हा कुठला न्याय?' हत्ती म्हणाला, 'अरे, त्याने आधी माझी खूप प्रेमाने देखभाल केली. मी अगदी लहान असताना मला उचलून आणलं.'

'म्हणजे त्याने तुला आईपासून तोडले ना? हा माणूस असाच आहे क्रूर ! लहान पोरांना आईपासून दुरावतो.' मी त्याला चिडून बोललो. बिचाऱ्याचे डोळे पाणावले. मग मला म्हणाला, 'आता तो खरा

रंग दाखवतोय. मला गुलामासारखं राबवतोय.' मी म्हणालो, 'अरे, अजूनही वेळ गेली नाहीये. दे जुगारून बंधन. तुझा एक पाय पुरेसा आहे सुटका करून घ्यायला. ये परत आपल्या जंगलात.' हा दुष्ट माणूस त्या हत्तीचा छळ करतो. त्याला स्वतःच्याच ताकदीचा अंदाजच नाहीये. परत येताना वाटेत एका घरात मी एक मोठा पाट बघितला. तो भिंतीवर बांधला होता. त्यावर हलणारी चित्रं दिसत होती. मी थांबून कुतूहलाने बघत राहिलो. बघतो तर काय, एक बिबटा कुठल्यातरी गावात शिरला होता. चुकून तो घाबरून पळत होता. माणसं पण घाबरूनच पळत होती. दोघेही एकमेकांच्या मागे होती. कोण कोणावर हल्ला करत होता, तेच कळत नव्हतं. अरे, आपल्यामध्ये केवढी ताकद आहे, ती सगळ्यांनी ओळखली पाहिजे. त्याचा वापर करायला पाहिजे. गाडीला घोडे जुंपतात. तुम्ही इथे कसे उधळता, लाथा मारता तसेच मारा ना लाथा माणसाला. काय हिम्मत करेल तो तुमच्यासमोर यायची? बैलांनो, तुमच्या शिंगांचा वापर करायला शिका. उगीच नाही दिली देवाने. तुमच्यासमोर चारा टाकून तो भुलवतो तुम्हाला. तुमची एक लाथ पुरेशी आहे त्याला औकातीत ठेवायला ! महाराज, मी त्या गावात जसा बिबट्या बघितला ना, तसेच तुमच्यासारखे इतर वाघ, सिंह पण बघितले. ते मोकळे होते आणि माणूस पिंजऱ्याच्या गाडीतून त्यांच्याकडे बघत होता. लहान तोंडी मोठा घास घेतोय, अहो साधा एक पंजा पुरेसा आहे. पंजाच काय, एका साध्या डरकाळीनेच त्यांचा थरकाप होईल. आपण माणसाच्या नादी लागत नाही, तर तो काय म्हणून आपल्या वाटेला लागतो? मला एवढेच सांगायचेय, स्वतःमधली ताकद ओळखा, त्याचा वापर स्वरक्षणासाठी करा.

या पक्षांना तर पंख दिलेत उडण्यासाठी. तरी ते पिंजऱ्यात जातातच कसे? सुंदर सुंदर पक्षी हा मानव पिंजऱ्यात डांबून स्वतःचे मनोरंजन करतो. तुम्हा मोरांच्या पिसांचा पंखा करून वारं खातो. स्वतः माणूसच तुम्हा पोपटांना हुशार म्हणतो, तरी तुम्ही पिंजऱ्यात जाता. कुठंय हुशारी? सापांनो, तुम्ही तर खूप विषारी. आम्हीपण कोणी तुमच्याशी दोस्ती करायच्या भानगडीत पडत नाही. पण माणूस प्राणी तुमचे दात उपटून, विष गोळा करून पुंगीवर नाचवतो. अरे ओका की विष त्यांच्यावर !

तर मला एवढंच विचारायचंय, का त्या मानवाचे गुलाम होताय? इथे आपल्याला जंगलात मुक्तपणे वावरता येते, मनसोक्त खाता येते. मग कशाला त्याच्या जाळ्यात अडकता? माणूस हा अतिशय भित्रा प्राणी आहे. तो स्वतःवर काही येऊ देत नाही; आणि जीवावर आलंच तर घाबरून सैरावैरा पळत सुटतो. आपल्याच जंगलावर घाला घालतो आणि आपण आसरा शोधण्यासाठी गेलो तर आपल्याला जेरबंद करतो. हा कुठला न्याय? देवाने प्रत्येकाला भरपूर ताकद, अक्कल दिलीय तर त्याचा वापर करा एवढेच मला सांगायचे आहे.''

लांडगा पोटतिडकीने बोलत होता. दोन मिनिटं जंगलात शांतता पसरली. आता मात्र सिंहिणीला राहवलं नाही. इतका वेळ बांधलेला धीर सुटला.

''तू एवढं ठामपणे कसं सांगू शकतोस? पूर्वीपासून जे चालत आलय त्यात तू मोडता कसा घालू शकतोस? तुझ्या बोलण्यावर आम्ही का विश्वास ठेवायचा?''

''महाराणी म्हणतात ते बरोबर आहे.'' वाघाने दुजोरा दिला. ''पुरावा काय तुझ्याकडे?''

''अहो, मी स्वतः बघून आलोय. अनुभव घेतलाय. आणखी कसला पुरावा पाहिजे?''

''म्हणजे फक्त तुझ्या बोलण्यावर आम्ही डोळे झाकून विश्वास ठेवायचा? कशावरून तू खरं

बोलतोस? तुझा धूर्तपणा काय कोणाला माहीत नाही?'' वाघिणीने शिक्कामोर्तब केलं.

बिबट्या उठून उभा राहिला, ''अरे, तू आमची शिकार चोरून खाणारा, आमच्या उष्ट्यावर जगणारा, तू आम्हाला शिकवतोस? तुझी लायकी ती आहे का?''

सिंहिणीला हायसे वाटले. मला जे वाटतं तेच या सगळ्यांना वाटतं हे बघून ती सुखावली.

''अरे अतिशहाण्या लांडग्या, देवानेच सांगितलं की चौसष्ट लक्ष योन्यानंतर मानवाचा जन्म मिळतो, ते सुद्धा पुण्य केलं की. म्हणून त्याला विकसित मेंदू दिलाय, ज्याने तो प्रगती साधतो. पृथ्वीवरील सृष्टीचं कल्याण करण्यासाठी मानवाचा जन्म आहे. आता तो तसं करतो की नाही, हे देव बघेल. ते आपलं काम नाही. देवाने प्रत्येक जीवाप्रमाणे मेंदूची कुवत दिलीय. तू असं आव्हान करू शकत नाहीस.'' हत्ती शांतपणे बोलला.

टपोऱ्या डोळ्यांची हरिणी हिंमत एकवटून म्हणाली, ''अरे, आम्हाला तर शिंगं पण नाहीत. बारीक लांबडे पाय आहेत. पळण्याशिवाय आम्ही काहीच करू शकत नाही.''

''मी तर दुबळा, बिळात लपण्याशिवाय काय करणार?'' ससा म्हणाला.

''माणसाच्या खालोखाल आम्ही, म्हणून आम्हाला कोणी पिंजऱ्यात अडकवत नाहीत.'' हायसे वाटून माकड म्हणाले.

''तुम्हाला तर इशाऱ्यावर नाचवून तो पोट भरतो. अरे अस्वला, तू एवढा अजस्त्र – तरी तुलाही नाचवून तो पैसा कमावतो. काय हे? विचार करा जरा.'' लांडगा आपला हेका सोडत नव्हता.


सर्व वाचकांना दीपावली व
नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

**९८ वर्षे अविरत सेवा**

# श्रीकृष्ण हॉटेल

**प्रोप्रा. प्रकाश मोरेश्वर कुंटे**
**मु.पो.बाजारपेठ, कुडाळ ४१६५२०, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. मोबा. ९४२०२६११४९**

**१९२८ सालापासून हॉटेलची सुरुवात**
**चहा फराळाची उत्तम सोय. रोज सकाळी ५ वा. मिळेल.**
**मालवणी पदार्थ मिळण्याचे एकमेव ठिकाण.**

**नाष्टा** • चहा • शिरा • भाजीपुरी • बटाटा वडा • सामोसा • बटाटा भजी • कांदा भजी • मालपोवा

**फराळ** • बेसन लाडू • रवा लाडू • मोतिचुर लाडू • खोबऱ्याची वडी • बालुशाही • बाम (गुलगुले) • शेवचिवडा • चकली • गुळाचे खाजे (मालवणी) • शेंगदाणा लाडू • शेव लाडू • बुंदी लाडू

''आम्हाला तर कोणीच पकडत नाही.'' जिराफ आपली मान ताठ करत म्हणाला.

''अरे कुठल्या जगात वावरतोस? मुंबईच्या राणीच्या बागेत जा. तुझे जातवाले आहेत तिथे. टाकलेला पाला खात बसलेत.'' लांडगा करवदला.

''तुला कोणी सांगितलं?'' त्यानं विचारलं.

''मगाशीच सांगितलं ना, त्या भिंतीवर अडकवलेल्या पाटावर हलणारी चित्रं दिसत होती. त्यात बघितलं ! मी एवढं पोटतिडकीने सांगतोय महाराज, निदान यावर विचार तरी करा !'' लांडगा काकुळतीने सांगत होता.

महाराज विचारात पडले. सगळ्या प्राण्यांचा कालवा सुरू होता.

''अहो, कसला एवढा विचार करताय? तो धूर्त लांडगा सांगणार आणि तुम्ही ऐकणार? ते काही नाही. त्याला तुम्ही हकलताय, का मीच हाकलू?'' सिंह काही बोलायच्या आतच सिंहिणीने त्याच्याकडे मोर्चा वळवला. संतापलेली सिहीण बघून सगळ्यांची पळता भुई थोडी झाली. तिने एकच गर्जना करून सारं जंगल दुमदुमवलं. शेपटी रागाने जमिनीवर आपटून लांडग्यावर झेप घेतली. सगळ्यांची एकच पळापळ झाली, सभा पांगली. सगळेजण जीव मुठीत धरून वाट मिळेल तसे पसार झाले. सिंहिण फुत्कार सोडत फेऱ्या मारू लागली. तिचे एरवी दंगा करणारे बछडे घाबरून गार झाले. सिंहानेपण तिला एवढं चिडलेलं कधीच बघितलं नव्हतं !

ती एवढी चिडली आहे, म्हणजे नक्कीच लांडग्यात काहीतरी खोट असणार. त्याशिवाय इतकी चिडणार नाही. मी तिचं आधीच ऐकायला हवं होतं. सिंह विचार करत झाडाखाली बसला. बिचारी सकाळपासून मला सांगत होती, पण मी ठार दुर्लक्ष केलं. बऱ्याच दिवसांनी कोवळं हरिण खाल्ल्यामुळे चांगलंच चढलं होतं. संध्याकाळी मीटिंगची भानगडच ठेवायला नको होती. असाही त्या लांडग्यावर विश्वास ठेवणे म्हणजे मूर्खपणा आहे. तो बहुतेक सगळ्यांची दिशाभूल करून ही म्हणते तसं माझं आसन बळकवण्याचा प्रयत्न करत असणार ! त्याची हिंमत चांगलीच वाढली की ! मुळातच अतिधूर्त आणि लबाड लांडगा, जरा मोकळीक दिली तर काहीही करू शकतो. याचा बंदोबस्त केलाच पाहिजे. नाहीतर सगळ्या प्राण्यांत गटबाजीचं राजकारण करून हा मला दगाफटका करू शकतो. काहीतरी करायलाच हवं. पण काय करायचं? त्याने सिंहिणीकडे बघितलं. संतापाने लाल झालेल्या चेहऱ्याने ती अजूनही फेऱ्या मारत होती. आता काही खरं नाही. तिच्याशी आत्ता बोलून काहीच उपयोग नाही. तिचा राग शांत झाल्यावर बोललेलं बरं, पण हिचा राग शांत तरी कसा होणार? अरे देवा !! परत 'तो'च उपाय करायला हवा. गेल्या वेळेस केलेला तोच. मागे पण एकदा ही अशची भडकली होती आणि कारण काय, तर एक वाट चुकलेली सिंहिण आमच्या हद्दीत आली आणि मी तिला सुखरूप तिच्या हद्दीत सोडले. हे काय कारण होतं का चिडायचं? (तशी ती होती पण हिच्यापेक्षा सुंदर ! जाऊ दे ! नको तो विषय) मग काय, हा मी एवढ्या मोठ्या जंगलाचा राजा, पण गुपचूप कोणी नसताना तिच्या पायाशी लोळण घेऊन गयावया करत माफी मागितली. कान पकडून उठाबशा काढल्या, तेव्हा कुठे बाईसाहेबांचा राग कमी झाला. शांत नाही, राग शांत होण्यासाठी मला काय काय करावे लागले हे सुज्ञांना न लगे सांगणे ! अहो, राजा वगैरे पद हे बायकोपुढे झूठ ! असो. आता परत तसंच करावं लागणार तर !!!

त्याने परत तिच्याकडे बघितले. चेहरा वाचायचा प्रयत्न केला. सिंहिण तावातावाने त्याच्यासमोर ठाकली.

''कसे हो निवांत बसू शकता आरामात? सकाळपासून सांगत होते, त्या लांडग्याचं लक्षण

काही ठीक दिसत नाही. शेवटी मी म्हणते, तसेच झालं ना? त्याला तुमचं आसन बळकवायचं आहे, म्हणून किस्से रंगवून रंगवून सांगत होता. एवढी साधी गोष्ट समजत नाही? जंगलचे राजे म्हणवता आणि तसं शोभेल असं वागता का? ते काही नाही, आधी उठा. ताबडतोब त्या अतिशहाण्या लांडग्याला हद्दपार करा. मला तो एक सेकंदही या जंगलात दिसता कामा नये. नाहीतर तुमचं काही खरं नाही. आधी उठा. ताबडतोब उठा म्हणते ना, एक सेकंदाच्या आत तो इथून जायला पाहिजे. गुन्ह्याला माफी नाही.''

एवढी भडकलेली सिंहिण बघून सिंह झटकन उठला. तराट जंगलाच्या दिशेने धुरळा उडवत उडवत गुडूप झाला. आता कुठे सिंहिण शांत झाली. बावरलेल्या बछड्यांना जवळ घेऊन चाटू लागली.

लांडग्याच्या तडीपारची बातमी वाऱ्यासारखी पसरली. सिंहाचे फर्मान ऐकून त्याने समजवायचा जिवापाड प्रयत्न केला, पण काहीच उपयोग झाला नाही. त्याला जंगलाला रामराम ठोकायला लागला. आता जायचे कुठे? हा मोठा प्रश्न त्याच्यासमोर होता. आहे त्याच जंगलात लपून राहणे अशक्यच होते. एक तर कोणी ना कोणीतरी बघणार आणि दुसरं म्हणजे त्या माणसांनी जंगलाची हद्दच कमी करायला सुरुवात केली. एक दिवस असा येणार ना, की या सगळ्या प्राण्यांना माणसांचाच आसरा घ्यायला लागणार. कसं कळत नाही या सगळ्यांना? मी किती पोट तिडकीने सांगत होतो. मला काय फायदा होता त्यात? पण नाहीच पटलं माझं म्हणणं. आपण स्वतःला ओळखायला हवं, आपली ताकद समजायला हवी. देवाने उगाच दिलेत का आपल्याला शिंग, टोकेरी दात, चपळ पाय, दणकट शेपटी, कधी त्याचा वापर करणार? हे देवा, जे मला समजतं ते या प्राण्यांना का नाही कळत? मी काही कोणाचा गुलाम बनून राहणार नाही.

देवाने मला चांगली अक्कल दिली आहे, चतुराई दिली आहे, माझ्या दातांकडे बघून माणूस बिचकतो या गोष्टींचा मी माझ्यासाठी वापर करणार. आता असंच करतो... नाहीतर त्या माणसाला काय हवंय? हे जंगल बळकवायचय ना? ठीक आहे, त्यालाच मदत करतो. म्हणजे या सगळ्या प्राण्यांची अक्कल ठिकाणी येईल. आधी त्या आगाऊ सिंहिणीलाच पकडून द्यायला मदत करतो. त्या भिंतीवरच्या पाटावर बघितलय मी सिंह माणसाच्या चाबकाच्या फटकाऱ्यावर ऐकत होता, तो म्हणेल तसं नाचत होता. इथे जंगलचा राजा म्हणून रुबाब करतो आणि तिथे माणसांच्या जगात पायात शेपूट घालतो. वा रे, म्हणे महाराज ! हे सगळं इतर प्राण्यांनी बघायला हवं होतं, म्हणजे या राजाची लायकी निघाली असती. इतकी दुनिया बघितली मी, एक गोष्ट लक्षात आली माझ्या. ती म्हणजे माझे जातवाले माणसांच्या राज्यात कुठेच दिसले नाहीत. ना पिंजऱ्यात, ना कुठे गळ्यात पट्टा घालून. ना कोणी गाडीला जुंपलेले. खरंतर जंगलचा राजा मीच हवा होतो. असा सरळ केला असता नं माणसाला, सगळे मला वचकून राहिले असते. सत्ता माझ्याच हातात घ्यायला हवी आता ! लांडगा स्वतःच्या विचारावर खुश झाला. या भित्र्या माणसाला अद्दल घडवायच्या ऐवजी जंगलवासियांनाच अद्दल घडवतो. आता मी माझा फायदा बघणार.

लांडगा सुसाट गावाच्या दिशेने निघाला. इतक्यात पाठीमागून परिचित हाक आली. त्याने वळून बघितले, डोळ्यात पाणी भरून ती त्याच्याकडे बघत होती. तो थबकला. शेपटी फुलवून तिच्या दिशेला वळला. पण क्षणात मनावर आवर घालत त्याने पाठ फिरवली.

''थांबा ना.'' ती म्हणाली.

''आता मला अडवू नकोस. मला तडीपार

केलंय. निघतो मी.''

''शेवटी मी म्हणाले तसंच घडलं ना? अहो, तुम्हाला किती वेळा समजावून सांगितलं होतं, त्या माणसांच्या नादी लागू नका. पण माझं ऐकलं नाही. आता संसार सोडून जायची वेळ आली. मला, पोरांना सोडून तुम्ही कुठे जाणार?'' तिचे डोळे वाहायला लागले.

''तू माझी काळजी करू नकोस. या जंगलाला माझी गरज नाहीये, मी निघतो आता.''

''अहो किती वेळा सांगितलं होतं तुम्हाला, की निसर्गाच्या विरोधात जाऊ नका. प्रवाहाविरुद्ध पोहता येत नाही. सारखे तुम्ही त्या माणसांच्या गावात जात होतात, किती धोका होता तुमच्या जीवाला? मला सारखा घोर लागून राहायचा. शेवट काय झालं बघितलं ना? अहो, जसं तुम्ही म्हणता आपल्यातली ताकद ओळखा, तसंच आपल्यातल्या मर्यादा पण ओळखायला शिका. देवाने जसे घडवले तसेच राहा. सृष्टीचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाला त्याने काही कमी, तर काही जादा दिलंय. नाहीतर कधीच सगळा ऱ्हास झाला असता. त्या सृष्टी नियंत्यापेक्षा कोणीच मोठं नाही. संध्याकाळी सभेत बघितलं मी, हे कुठलं खुळ तुमच्या डोक्यात शिरलं? तुम्ही म्हणता, तसं कधी घडेल का? माणूस प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ असला, तरी त्याच्या पण काही मर्यादा आहेतच, परिपूर्ण नाहीये! तो सुद्धा निसर्गाच्या विरोधात गेला की, संपतोच ! परमेश्वरापेक्षा कोणी मोठं नाही, हे तुम्ही मान्य करा!'' ती पोटतिडकीने बोलत होती .

''ए, मला उगाच लेक्चर मारत बसू नकोस. तू काय जग पाहिलंस गं? काय अक्कल आहे तुला? मला माहिती आहे, मी काय करतोय ते. तुझा शहाणपणा ठेव तुझ्याकडे. जा त्या पोरांकडे बघ. तुझी अक्कल तिथंपर्यंतच !'' पाठ फिरवून निघालेल्या लांडग्याकडे ती हातबल होऊन बघत राहिली.

इकडे लांडग्याला हजारो विचार सतावू लागले. आता अक्कलहुशारीनेच पुढचे डावपेच लढले पाहिजेत. जराशी जरी चूक झाली तरी महागात पडेल. माणसं मला पाहून धूम ठोकतात, पण त्याला जर मदत केली तर तो घाबरणार नाही. त्याचा फायदा लक्षात आणून देईन. त्या आगाऊ सिंहिणीला पकडून दिलं की झालं. ही लढाई मी जिंकलीच. सिंहाच्या मनमानीला कंटाळलोय. म्हणे मीटिंग असली की प्रोटोकॉल. कोणी कोणाची शिकार करायची नाही ! अरे, असं कसं? पोटासाठीच तर जगतो आपण. भूक लागल्यावर खायचं नाही? असला कसा हा प्रोटोकॉल? तिथं माणसं बघा म्हणावं, भूक लागली की खातात. काळ नाही, की वेळ नाही. माणसांची पोरं पण रंगीत पुडीतलं कुरकुर आवाज करत सतत खात असतात. नुसत्या कल्पनेने पण तोंडाला पाणी सुटतं. खरंतर देवाने मला जंगलाचा राजा करायला हवा होता. काय बिषाद झाली असती माणसाची, जंगलाला बोट लावायची. पण काही म्हणा, माणसाचं डोकं मात्र भारी चालतं हं ! पुरेपूर आम्हा जंगलवासियांचा वापर करून घेतो. देवानं एवढं देऊन सुद्धा त्याला हे कमीच पडतं. हिचं म्हणणं की मी निसर्गाच्या विरोधात जातोय. माणूस पण जातोच की, त्यांचं काय वाईट झालं? जाऊदे, मी का इतका विचार करतोय? मला माझ्याच लोकांनी तडीपार केलय हे विसरणार नाही. आता माणसांची हद्द आली आहे. जातोच त्यांच्यात आणि... अरे... माझा पाय कशात अडकला?... डोकं पण आपटलं माझं... हा एवढा अंधार कसा झाला अचानक...

''अरे, बरं झालं पकडलं त्याला. किती त्रास दिलाय त्यानं...'

''माझ्या सहा-सात कोंबड्या फस्त केल्यात साल्यानं...''

‘‘तोंड बघ त्याचं? दात कसे विचकलेत...’’

‘‘कसला बेरकी दिसतोय... मेला का बघा. किती पळवलंय गाववाल्यांना त्यानं.’’

‘‘कशाला बघा? मारतोच आता. त्याच्या कातड्याच्या चपलाच बनवतो. झीट आणली त्याने.’’

‘‘चार दिवस सापळा लावला, तेव्हा कुठे आज अडकला. इतके दिवस छर्रे मारून पण काहीच फायदा झाला नाही. पळून जायचा साला.’’

‘‘बॉडी बघ कशी आहे त्याची, तुझ्या कोंबड्या खाऊन खाऊन !’’

‘‘त्या गोष्टी सारखंच झालं. पोरं सांगत होती, लांडगा आला रे... आपण कोणीच विश्वास ठेवला नाही. पण खरंच येत होता हा.’’

‘‘पण गोष्टीत लांडगा येतच नव्हता, पोरं खोटं सांगत होती. तेव्हा विश्वास ठेवत होते लोक. आत्ताच कोण ठेवत नाही. सगळंच उलट सुलट झालंय. कलियुग !’’

लांडगा हताशपणे मुक्ताफळं ऐकत राहिला.

पान ७४ वरून पुढे चालू

## समर्पण - संत कान्होपात्रा

करायचा, त्याच्यासमोर नृत्य करायचं, गाणं गायचं, त्याची षोडशोपचार पूजा बांधायची आणि त्या दरम्यान आपले आणि इतर संतांचे अभंग गाऊन त्याला आळवायचं. असा तिचा दिनक्रम सुरू झाला. विठ्ठलाच्या प्रेमात वेडी झालेली कान्होपात्रा आता अभंगही रचायला लागली. त्यातून ती आपलं विठ्ठलावरचं उत्कट प्रेम प्रकट करू लागली. तिच्या सौंदर्याची कीर्ती दूरदूर पसरली. ती बिदरच्या सुलतानाच्याही कानावर गेली. त्याला कान्होपात्रा सारखी लावण्यावती आपल्या जनानखान्यात असावी असं वाटू लागलं. दरम्यान त्याला समजलं की आपला दरबारी सदाशिव मालगुजरची ती मुलगी आहे. हे समजल्यावर त्यानं सदाशिववर दबाव टाकायला सुरुवात केली, तर इकडं माया आणि शामानी कान्होपात्राचं मन वळवायला सुरुवात केली. कान्होपात्रेनं मग एक अट घालती की, मी जर बिदरला जायला हवी असेल तर त्या आधी मला महिनाभर पंढरपूरला माझ्या पतीच्या म्हणजे विठ्ठलाच्या सेवेत रहायचे आहे. त्या गोष्टीला त्या दोघींनी परवानगी दिली.

कान्होपात्रा पंढरपूरला आली. तिथं विठ्ठल मंदिराची स्वच्छता, झाड-लोट करून विठ्ठलसमोर बसून अभंग गाण्यात आणि त्याच्यासमोर नृत्य करण्यात तिनं आपला वेळ व्यतीत केला. तिथं तिचा परिचय मंदिराचे पुजारी माधवशास्त्री यांच्याशी झाला. ही देखणी पोर विठ्ठलाची इतकी उत्कट भक्ती करते याचे त्यांना कौतुक वाटले. पण ती नायकिणीची पोर आहे हे समजल्यावर त्यांचा जीव हळहळला. तरीही कान्होपात्रेचं पंढरपुरात राहून विठ्ठलाची सेवा करण्याचं काम बघून ते प्रभावित झाले. तिथे राहून कान्होपात्रा रोज एक अभंग रचत असे आणि त्याला चाल लावून तो विठ्ठलासमोर साभिनय गात असे. कधी कधी ती बेभान होऊन नृत्यही करत असे. आपल्याला आपल्या आई आणि आजीनी इथं महिनाभर राहण्याची अनुमती दिली आहे. तर तेवढ्या वेळात आपण ज्याला पती मानला आहे, त्याची जास्तीत जास्त सेवा करायची असा तिचा मानस होता. तिथं राहून नृत्य गायनाबरोबरच ती विठ्ठलाजवळ आपलं दु:ख सांगत असे. आपल्या मनातील व्यथा बोलून दाखवत असे. विठ्ठल हाच तर आपला पती आहे, हे तिच्या मनानं इतकं पक्कं घेतलं होतं, की दुसऱ्या पुरुषाचा विचारही तिच्या

मनांत येत नसे. आणि विठ्ठल हा आपला पती आहे तेव्हा पती या नात्यानं पत्नीचं रक्षण करणं त्याचं कर्तव्य आहे अशी तिची भावना होती. आणि तीच भावना ती विठ्ठलाला बोलून दाखवत असे. दरम्यान सदाशिवचा कान्होपात्रेला आपल्याकडं पाठवण्यास नकार आहे आणि त्यासाठी तो तयार नाही हे बादशहाच्या लक्षात आलं.

सदाशिव ऐकत नाही, म्हटल्यावर बादशहा इरेला पडला. त्यानं आपल्या इतर सरदारांकरवी सदाशिवला कोंडीत पकडला. त्यानं अशी परिस्थिती निर्माण केली की बादशहाला होकार देण्यावाचून सदाशिवला पर्यायच राहिला नाही. सदाशिवला होकार द्यायला लावून बादशहाने माया आणि शामाला मोठमोठे मौल्यवान नजराणे पाठवून मोहात पाडले. आपली लेक बादशहाच्या पदरी जाणार या गोष्टीचा त्या दोघींना आनंद झाला आणि एक दिवस नक्की करून बादशहाने कान्होपात्रेला मंगळवेढा येथून बिदरला आणण्यासाठी मेणा आणि सैनिक पाठवले. कान्होपात्रेला जेव्हा हे समजलं तेव्हा तिने विरोध केला, पण आई-आज्जीपुढे तिचं काही चाललं नाही. तिला नटवून, साजशृंगार करून दोघींनी मेण्यात बसवलं. सैनिक मेण्याच्या मागेपुढे चालत होते. मेणा मंगळवेढ्यातून बाहेर पडला आणि कान्होपात्रेच्या मनांत एक विचार आला. तिनं त्या सैन्याच्या तुकडीच्या प्रमुखाला बोलावलं. तो धावत मेण्याजवळ गेला. मंगळवेढ्याहून बिदरला येईपर्यंत कान्होपात्राची नीट आणि चोख बडदास्त ठेवायची असा बादशहाचा सख्त हुकूम होता. तो सैन्यप्रमुख आल्यावर कान्होपात्रानं सांगितलं की, इथून दहा कोसांवर माझे पती रहातात. (मंगळवेढा पंढरपूरपासून दहा कोस म्हणजे २० मैल आहे.) आता मी बादशहांकडे निघाले आहे. मी परत मंगळवेढ्याला येऊ शकणार नाही. तेव्हा मला माझ्या पतीला हे सांगावे लागेल. मला पंढरपूरला घेऊन चला. तिच्या सागंण्यावरून आणि बादशहाचा हुकूम होता त्यामुळं मेणा पंढरपूरकडं नेला. मंदिराजवळ आल्यावर पतीला भेटून सांगून येते असं म्हणून कान्होपात्रा मेण्यातून उतरून मंदिरात गेली. शिपाई मुस्लिम असल्याने मंदिराच्या बाहेर उभे राहिले. कान्होपात्रा आत गेली त्यावेळी मंदिरात कोणी नव्हते. कान्होपात्रा धावत मंदिरात शिरली. ती थेट गाभाऱ्यात गेली. तिथं जाऊन विठ्ठलाला आळवू लागली. या संकटातून मला सोडव. मी तुझी पत्नी आहे. तू पती आहेस, तर माझे रक्षण कर असे आर्त स्वरात विनवू लागली. एका क्षणी तिनं विठ्ठलाच्या चरणाला मिठी मारली. त्याच्या पावलांवर मस्तक ठेवले आणि तत्क्षणी तिनं प्राण सोडला. विठ्ठलावर अत्यंतिक भक्ती करणारी, पती समजून त्याच्यावर उत्कट प्रेम करणारी कान्होपात्रा विठ्ठलचरणी विलीन झाली !

बादशहाचे सैनिक बाहेर तिची वाट बघत थांबले होते. कान्होपात्रेचे कलेवर गाभाऱ्यात विठ्ठलाच्या पायाशी पडले होते. पुजारी तिथं येऊन पाहतात तो हे दृश्य त्यांना दिसले. बाहेर बादशहाचे शिपाईही उभे होते. ते बघून भ्यायलेल्या पुजारी मंडळींनी कान्होपात्रेचा निष्प्राण देह उचलला आणि मंदिराच्या मागच्या दाराने बाहेर काढून मंदिराच्या पाठीमागे पुरला आणि त्यावर एक झाड लावले आजही ते तरटीचे झाड तिथे आहे. आणि त्या झाडाखाली कान्होपात्रा आहे अशी लोकांची समजूत आहे. आषाढी-कार्तिकी यात्रेला त्या झाडाची पाने भक्तगण प्रसाद म्हणून घरी नेतात. नायकिणीची मुलगी असूनही आपल्या उत्कट विठ्ठलभक्तीनं आणि उत्कट अभंगानं संतपदाला पोहोचलेली आणि विठ्ठलाच्या चरणांवर प्राणांचं समर्पण करणारी कान्होपात्रा ही एकमेव संत आहे. आठशे वर्षे होऊन गेली पण तिच्या अभंगातून आणि तिच्या विलक्षण कहाणीतून आजही कान्होपात्रा 'संत कान्होपात्रा' म्हणून लोकांच्या मनांत जागा ठेवून आहे. तिची ही विलक्षण जीवनगाथा तिच्या भक्तीचं, श्रद्धेचं प्रेरणादायी गोमटं स्वरूप आहे.



| जी एस् चाय | જી એસ ચા | जी एस् चहा | ಜಿಎಸ್ ಚಹಾ | جی ایس چاۓ |
GS चहा
उत्सव उत्साहाचा अभिमान देशाचा..
SINCE 1898
125 Years of Customer's Service
Extra Strong
GS TEA
CTC DUST
ASSAM GOLDEN
SCAN ME
SINCE 1898
AN ISO 9001 2008 CERTIFIED COMPANY
From The House of Govindram Shobharam & Co.
Enquiry / Information : www.gsbrands.com
*Suggested Serving Only

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2022-2024


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

## Manufacturers of Printed Circuit Boards
## Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

### Quality Approvals

ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com

**Visit us at :** www.shogini.com